







# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा








रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०१.०८.२०२५ | अंक नं. १०५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020










# ५०० रुपयांच्या बनावट चलनी नोटांचा छापखाना पोलिसांनी केला उध्वस्त, सात गुन्हेगारांना अटक, ५९ लाखांच्या बनावट नोटा व छपाई साहित्य जप्त

नगर – भारतीय चलनातील ५०० रुपयांच्या नोटांसारख्या हुबेहूब बनावट नोटा छापण्याचा कारखाना नगर तालुका पोलिसांनी उद्धवस्त केला आहे. बनावट नोटांचे हे रॅकेट चालविणाऱ्या एकूण ७ सराईत गुन्हेगारांना अटक करण्यात आली असून त्यांच्या ताब्यातून ५९ लाख ५० हजार रुपयांच्या ५०० च्या बनावट चलनी नोटा, २ कोटी १६ लाखांच्या बनावट नोटा तयार झाल्या असत्या एवढे कागद व शाई इत्यादी प्रकारचे साहित्य तसेच २७ लाख ९० हजार ६०० रुपये किंमतीचे बनावट नोटा तयार करण्याचे अत्याधुनिक छपाई मशिन, संगणक इत्यादी साहित्य असा ८८ लाख २० हजार ६०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असल्याची माहिती जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी अप्पर पोलिस अधिक्षक वैभव कालुबर्मे, पोलिस उपअधीक्षक अमोल भारती, स.पो.नि. प्रल्हाद गिते उपस्थित होते. याबाबत माहिती देताना अधिक्षक घार्गे पुढे म्हणाले की, स.पो.नि. गिते यांना २७ जुलै रोजी रात्री माहिती मिळाली की, दोन इसम एक काळ्या रंगाचे महिंद्रा थार गाडीमध्ये फिरत असुन त्यांच्याकडे पाचशे रुपये दराच्या बनावट चलनी नोटा आहेत आणि ते आंबीलवाडी शिवारात प्रत्येक पान टपरीवर देवुन सिगारेट खरेदी करत आहेत. ही माहिती मिळताच त्यांनी पोलिस पथकाला सोबत घेत आंबीलवाडी शिवारात निखील शिवाजी गांगर्डे (वय २७ रा. कोंभळी, ता. कर्जत), सोमनाथ माणिक शिंदे (वय २५, रा. तपोवन रोड, अहिल्यानगर) यांना पकडले. त्यांच्या गाडीची झडती घेतली असता त्यांचेकडे ८० हजार रुपयांच्या ५०० रुपये दराच्या बनावट चलनी नोटा मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन त्यांच्यावर गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याचा अधिक तपास करताना बीड जिल्ह्यातुन प्रदिप संजय कापरे (वय २८ रा. तिंतरवणी ता. शिरुर कासार जि. बीड) तसेच छत्रपती संभाजीनगर मधुन मंगेश पंढरी शिरसाठ (वय ४० रा. शिवाजीनगर, छत्रपती संभाजीनगर), विनोद दामोधर अरबट (वय ५३, रा. सातारा परिसर, छत्रपती संभाजीनगर), आकाश प्रकाश बनसोडे (वय २७, रा. निसर्ग कॉलनी पेठेनगर ता.जि. छत्रपती संभाजीनगर), अनिल सुधाकर पवार (वय ३४ रा. मुकुंदनगर ता.जि. छत्रपती संभाजीनगर) यांना पकडले. या रॅकेट चा मुख्य सूत्रधार अंबादास रामभाऊ ससाणे (रा. शहर टाकळी ता. शेवगाव) हा अद्याप फरार आहे. त्याचा शोध घेतला जात आहे.

### वाळुंज एमआयडीसीत होता छापखाना

या आरोपींकडे कसून चौकशी केल्यावर त्यांनी छत्रपती संभाजीनगर मधील वाळुंज एमआयडीसीत एक घर भाड्याने घेवून त्यामध्ये बनावट नोटा तयार करण्याचा छापखाना असल्याचे सांगितले. पोलिसांनी तेथे जावून त्या घरातून ५९ लाख ५० हजार रुपयांच्या ५०० च्या बनावट चलनी नोटा, २ कोटी १६ लाखांच्या बनावट नोटा तयार झाल्या असत्या एवढे कागद व शाई इत्यादी प्रकारचे साहित्य तसेच २७ लाख ९० हजार ६०० रुपये किंमतीचे बनावट नोटा तयार करण्याचे अत्याधुनिक छपाई मशिन, संगणक इत्यादी साहित्य असा ८८ लाख २० हजार ६०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

सदरची कारवाई पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांचे मार्गदर्शनाखाली व अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, (पुढील मजकूर व छायाचित्र पान २ वर)

# जादा परतावा देण्याच्या नावाखाली गुंतवणूकदारांची ४५० कोटींची फसवणूक

## ‘सिस्पे कंपनी’च्या संचालक मंडळावर अखेर सुपा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – ‘सिस्पे कंपनी’,ट्रेडज इन्व्हेस्टमेंट प्रा.लि. या कथित फायनान्स कंपन्यांनी पारनेर तालुक्यातील २१ हजार ३६१ गुंतवणूकदारांची तब्बल ४५० कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अधिक परताव्याचं आमिष दाखवून ही फसवणूक करण्यात आली असून या प्रकरणी १ ऑगस्ट रोजी पहाटे कंपनीच्या संचालक मंडळावर फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. या कंपनीवर काही दिवसांपूर्वी श्रीगोंदा आणि नगर शहरातील तोफखाना पोलिस ठाण्यातही गुन्हे दाखल झालेले आहेत

याबाबत विनोद बबन गाडीलकर (वय ४४, रा. माळवाडी, वाघुंडे, ता. पारनेर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची २०२२ मध्ये नगरमधील एका कार्यक्रमात कंपनीचा मार्केटिंग डायरेक्टर नवनाथ जगन्नाथ अवताडे याच्याशी ओळख झाली होती. त्यावेळी त्याने आमच्या कंपनीत गुंतवणूक केल्यास ज्यादा परतावा मिळेल अशी माहिती सांगितली. त्यानंतर त्याने फिर्यादी यांना एक दिवस पुण्यात बोलावून घेतले. तेथे त्याने कंपनीचा सीईओ अगस्त मिश्रा, संचालक राहुल काळोखे, गौरव सुखदेवे, प्रसाद कुलकर्णी, सचिन खडतरे, चेतन धर, ययाती मिश्रा यांची ओळख करून दिली. त्यानंतर या सर्वांनी ट्रेडज इन्व्हेस्टमेंट प्रा.लि. या कंपनीची सविस्तर माहिती सांगून गुंतवणुकीतून दरमहा १० ते १५ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखविले. त्यानंतर फिर्यादी सह पारनेर तालुक्यातील अनेकांना मोठमोठ्या पंचतारांकित हॉटेल मध्ये मिटिंग घेवून मोठ मोठे आमिष दाखविले. त्यामुळे फिर्यादीसह अनेकांनी या कंपनीत गुंतवणूक केली. त्यांना विश्वास बसावा म्हणून काही दिवस कसा बसा १० ते ११ टक्के परतावा दिला. त्यामुळे पारनेर तालुक्यातील सुमारे २१ हजार ३६१ गुंतवणूकदारांची तब्बल ४५० कोटी रुपयांची गुंतवणूक केली. त्यानंतर काही दिवसांनी कंपनीने परतावा देणे बंद केले.

सुपा व परिसरातील गुंतवणुकदारांचे प्रथम सिस्पे नंतर ट्रेडज इन्व्हेस्टमेंट, इन्फीनाईट बिकन मल्टीस्टेट या नावाची कंपन्या सुरु करून शेअर्समध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली व १० ते १२ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून कोट्यावधी रूपये जमा केले. या कंपनीकडूनही गुंतवणुकदारांचे काही दिवसांपासून पैसे परत मिळेनासे झाले आहेत. कंपनीचे काम सुरू आहे. कंपनीचे नाव बदलले आहे. परकीय चलनात आपले शेअर्स बदलले जात आहेत, सॉफ्टवेअर दुरुस्ती सुरू आहे, अशी कारणे सांगत गुंतवणुकदारांना काही दिवस झुलवत ठेवले होते. मात्र नंतर काही दिवसांपूर्वी कंपनीचे कार्यालय बंद झाल्याने आता पैसे मिळणार नाहीत, अशी खात्री गुंतवणुकदारांची झाली. त्यांनी एजंटांना जाब विचारण्याचा प्रयत्न केला. मात्र एजंटांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.

त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्यावर फिर्यादी सह अन्य गुंतवणूकदारांनी जिल्हा न्यायालयात तक्रार दाखल केली. या तक्रारीची दखल घेत न्यायालयाने याबाबत गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिल्या नंतर या कंपनीचे सीईओ अगस्त मिश्रा, संचालक राहुल काळोखे, गौरव सुखदेवे, प्रसाद कुलकर्णी, सचिन खडतरे, चेतन धर, ययाती मिश्रा मार्केटिंग डायरेक्टर नवनाथ जगन्नाथ अवताडे यांच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक ज्योती गडकरी या करीत आहेत.











SONI TILES Since 1965 AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# अहिल्यानगर जिल्ह्यात ७ ऑगस्ट पर्यंत महसूल सप्ताहाचे आयोजन : जिल्हाधिकारी

नगर - महसूल विभागामार्फत नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा व विविध योजनांची माहिती मिळावी, त्यांचा लाभ घेता यावा, नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी आणि शासनाबद्दलचा विश्वास वाढावा, या उद्देशाने जिल्ह्यात १ ते ७ ऑगस्ट दरम्यान महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिली.

राज्य शासनाच्या निर्देशानुसार हा सप्ताह साजरा करण्यात येणार असून यादरम्यान महसूल विभागाच्या सेवा प्रभावीपणे नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जातील. शेतकरी व नागरिकांच्या तक्रारींचे निवारण व महसूल विषयक जनजागृती हा सप्ताह साजरा करण्यामागचा मुख्य हेतू आहे.

१ ऑगस्ट रोजी महसूल दिन साजरा केला जाणार आहे. यावेळी महसूल सप्ताहाचा शुभारंभ होईल. कार्यरत व सेवानिवृत्त महसूल अधिकारी-कर्मचाऱ्यांशी संवाद साधण्यात येईल. उत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुरस्कार देण्यात येतील. मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरणही होईल.

२ ऑगस्ट रोजी शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी असलेल्या पात्र कुटुंबांना अतिक्रमित जागांचे पट्टे वितरित करण्याचा कार्यक्रम होईल.

३ ऑगस्ट रोजी पाणंद व शिवार रस्त्यांची मोजणी करून त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

४ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान मंडळनिहाय राबवले जाणार आहे.

५ ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी प्रक्रिया अपूर्ण असलेल्या लाभार्थ्यांना घरभेटी देऊन डीबीटी पूर्ण करून अनुदान वितरित केले जाईल.

६ ऑगस्ट रोजी शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे हटविण्यात येणार असून, शर्तभंग झालेल्या जमिनींचे सरकारजमा करण्याचा निर्णय शासन धोरणानुसार घेतला जाणार आहे.

७ ऑगस्ट रोजी एम-सँड धोरणाची अंमलबजावणी करण्यात येईल. नवीन मानक कार्यपद्धतीनुसार हे धोरण पूर्णत्वास नेले जाईल. याच दिवशी महसूल सप्ताहाचा सांगता समारंभ होणार आहे.

या सप्ताहातील सर्व कार्यक्रमांमध्ये जिल्ह्यातील नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी केले आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन 'मुसाफिर'-९८२२०२०६९१

### कुठे आहे मूल्यशिक्षण? कुठे चाललेत कारखाने?



प्रॅक्टीकल भाषेत नवी पिढी व शिकणारे, शिकवणारे व्यावसायिक पद्धतीने शिक्षण चालवतात अशी परिस्थिती बिकट व गंभीर आहे.

सनातन संस्कृतीत ऋषी परंपरेत आश्रमात विद्यार्थी शिक्षण घ्यायचे. मागील शतकात शिक्षक व गुरुजन वंदनीय होते. तपस्या समजून, मेहनत करुन शिष्य परंपरा तयार करायचा पिढी घडवायचा.

माता-पित्यांपेक्षा गुरुजनांना ऐकण्याचा कल होता. त्यांना आदर्श, आयडॉल मानले जायचे. इतकेच काय ५-६ दशकांपूर्वी आपल्याला शिक्षकांचा भीतीयुक्त आदर वाटायचा. त्यांच्या शिक्षणासह संस्कार व उपदेशाने त्यांचे जीवनभर ऋणी राहावेसे वाटायचे. आज केवळ उच्चभ्रू, प्रसिद्ध शिक्षण संस्था असतील तरच विद्यार्थी, पालकांना अभिमानाने सांगावेसे वाटते.

या बदलत्या परिस्थितीला आपण सगळेच जबाबदार आहोत. प्रत्येक पालकाला आपला मुलगा 'स्टॅन्डर्ड' व्यावसायिक शिक्षण संस्थेत शिकावा वाटतो कारण त्यांना पाल्याला पैसे कमवण्याचे साधन बनवायचे आहे. या करिअर पुढे संस्कार, जीवनमूल्य यांना थाराच नाही जणू !

त्यात माध्यमाचे स्तोम. चांगले शिकवणारे, त्यांना प्रोत्साहन देणारे असतील तर सीबीएस, इंग्रजी माध्यमांप्रमाणे सरकारी व मराठी माध्यमाच्या शाळाही लोकप्रिय होतील.

भरमसाठ वाढलेल्या शिक्षणसंस्था, विद्यार्थ्यांची वाढती संख्या दोषी आहे की विशेषत: शिक्षकांची बौद्धिक उंची कमी झालीय? की शासन संस्थाचालक त्यांना इतर कामांत जुंपतात?

आजच्या विद्यार्थी पालकांना फक्त गुणांत स्वारस्य दिसते. सर्वांगिण व्यक्तिमत्त्व हे सगळेच विसरुन गेलेत. सध्याच्या शिक्षण पद्धतीत गुरूशिष्य परंपरा अभावानेच दिसते. अपवाद संस्था व शिक्षक निश्चित असतील आहेत. पण अपवादाने नियमच सिद्ध होतो ना. केवळ अभ्यासक्रम, नोटस्, शिकवणी असतील तर शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ यांच्यात फरक तरी काय? ज्याला जे आवडेल ते शिकण्याची सोय, व्यवस्था झाली तरच उज्वल भविष्य घडेल.

बघा पटतयं का तुम्हालाही...



नगर तालुका पोलिसांनी बनावट नोटा तयार करण्याचा छापखाना उघडकीस आणल्यानंतर जप्त केलेल्या साहित्यासह पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे अप्पर पोलिस अधिक्षक वैभव कालुबर्मे, पोलिस उपअधीक्षक अमोल भारती, स.पो.नि. प्रल्हाद गिते व तपास पथकातील अंमलदार.

# ५०० रुपयांच्या बनावट चलनी नोटांचा छापखाना पोलिसांनी केला उध्वस्त

(पान नं.१ वरुन)

पोलिस उपअधीक्षक अमोल भारती यांचे सुचनेनुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते, उपनिरीक्षक भरत धुमाळ तसेच पोलिस अंमलदार सुभाष थोरात, रविकिरण सोनटक्के, बाबासाहेब खेडकर, मंगेश खरमाळे, शरद वांढेकर, खंडु शिंदे, सागर मिसाळ, राजु खेडकर, विक्रांत भालसिंग, अदिनाथ शिरसाठ, अन्सार शेख, महिला पो.हे.कॉ.मोहिनी कर्डक, दक्षिण विभाग मोबईल सेलचे पो.कॉ. नितीन शिंदे यांच्या पथकाने केली आहे.

### तपास पथकाला ५० हजारांचे बक्षीस जाहीर

यावेळी पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी तपास पथकातील प्रत्येक अधिकारी, पोलिस अंमलदार यांचे अभिनंदन केले. नगर तालुका पोलिसांनी केलेली ही कारवाई गेल्या ३ - ४ वर्षातील राज्यातील मोठी कारवाई असल्याचे सांगत या तपास पथकाला ५० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले. महिनाभरापूर्वी राहुरी पोलिसांनीही बनावट नोटांचे एक रॅकेट उघडकीस आणले होते. मात्र त्या नोटा लगेच लक्षात येण्यासारख्या होत्या. या कारवाईतील नोटा अतिशय अत्याधुनिक यंत्र सामग्री वापरून तयार केलेल्या आहेत. त्यामुळे त्या अगदी हुबेहूब असून सर्वसामान्यांच्या लवकर लक्षात येणार नाहीत अशा आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व बँकांना पत्र पाठवून अशा बनावट नोटा जर बँकेत आल्या तर लगेच पोलिसांना कळविण्याच्या सूचना देण्यात येणार आहेत. तसेच या रॅकेट मधील अन्य आरोपींचा कसून शोध घेणार असल्याचे अधिक्षक घार्गे यांनी सांगितले.

# पतसंस्थेचे डेली कलेक्शन करणाऱ्याने नगरमधील व्यावसायिकांची केली ६३.८२ लाखांची फसवणूक

नगर - पतसंस्थेत गुंतवणुकीवर चांगला परतावा मिळेल असे सांगून विश्वास संपादन करून डेली कलेक्शन करणाऱ्या एकाने गुंतवणूकदारांची तब्बल ६३ लाख ८२ हजार रुपयांची फसवणूक करत नगर मधून पळ काढला असल्याचे समोर आले आहे. हा प्रकार जून २०१५ ते २९ जून २०२५ दरम्यान घडला असून या प्रकरणी संतोष हस्तीमल मावाणी (रा. दत्त मंदिराजवळ, सिव्हील हायको, सावेडी, अ.नगर) याच्या विरुद्ध तोफखाना पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत प्रोफेसर कॉलनी चौकातील मारुतीराव मिसळ हॉटेलचे चालक अतुल दत्तात्रय खामकर (वय ३१, रा. गवळी वाडा, भिंगार कॅम्प, अ.नगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. फिर्यादी यांचा प्रोफेसर चौक येथे हॉटेल व्यवसाय असून ते आरोपी संतोष हस्तीमल मावाणी याच्याकडे १० वर्षापासून डेली कलेक्शन दररोज पाच हजार रुपये जमा करीत आहेत. मावानी यांने सुरुवातीला एका अज्ञात पतसंस्थेचे आणि नंतर दुर्गाशंकर मल्टीस्टेट पतसंस्थेचे पुस्तक फिर्यादी यांना दिले होते.

मावाणी याने फिर्यादीचा विश्वास संपादन करुन फिर्यादी यांना तुम्ही पतसंस्थेत १५ लाख रुपये गुंतवा, तुम्हाला भरघोस परतावा मिळेल असे आमिष दाखवले. त्यावरुन फिर्यादी यांनी एचडीएफसी बँक खात्यातून मावाणीच्या युनियन बँक खात्यावर ऑनलाईन १० लाख रुपये ट्रान्सफर केले. याशिवाय डेली कलेक्शनच्या जमा रकमेतील ५ लाख त्याच्याकडे आधीपासून होते. परंतु मुदतीनंतर मावानी याने फिर्यादी यांना रक्कम परत दिली नाही.

२९ जून रोजी मावाणी नेहमीप्रमाणे हॉटेलवर येऊन डेली कलेक्शनचे पुस्तक घेऊन गेला. मात्र, दुसऱ्या दिवशी त्याचा फोन बंद असल्याने फिर्यादी यांनी मावानी याच्या राहते घरी शोध घेतला असता त्याच्या घराला कुलूप असल्याचे निदर्शनास आले. शेजारील व्यापाऱ्यांनीही त्याचा शोध घेतला असता मावानी हा मध्यरात्री घर सोडून पळून गेल्याचे समजले. फिर्यादी यांनी अधिक चौकशी केली असता मावानी याने वासुदेव द्वारकादास किंगर (रा. मुन्सिपल हडको सावेडी) यांचे २ लाख २० हजार रुपये, महेशकुमार बाळासाहेब नाईक (रा. सिव्हिल हडको अ. नगर) यांचे ६ लाख ८२ हजार रुपये, हरमितसिंग हरिसिंग चावला (रा. गोविंदपुरा, गुरुद्वारा जवळ अ.नगर) यांचे ८ लाख रुपये, कमल चमनलाल कंत्रोड (रा. तारकपूर अ.नगर) यांचे २२ लाख ८० हजार रुपये, डॉ. संतोष गायकवाड (माणिक नगर, अ.नगर ) यांचे ९ लाख रुपये अशी ६३ लाख ८२ हजार रुपयाची फसवणूक केली असल्याची समजले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद घेण्यास उशीर होत असल्याने १ जुलै रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयात तक्रार अर्ज दिला. या तक्रार अर्जाच्या चौकशीनंतर अतुल खामकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन संतोष मावाणी विरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. २०२३ कलम ३१६(२) व ३१८(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक एम.एन. गोटला करीत आहेत.

# केडगावमध्ये किरकोळ वादातून कोयत्याने हल्ला

नगर - केडगाव परिसरातील माधवनगर येथे किरकोळ वादातून राग आल्याने सख्ख्या भावाने दुसऱ्या भावावर कोयत्याने वार करुन गंभीर जखमी केले. ही घटना ३१ जुलै रोजी मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत प्रफुल्ल प्रमोद आल्हाट (वय ४१, रा. विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, माधवनगर, केडगाव) याने पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. दाखल केलेल्या फिर्यादीनुसार, फिर्यादी याचे मध्यरात्री आई उषा आल्हाट यांच्यात घरगुती जेवणासंदर्भात बोलणे चालू असताना, राजेंद्र याने विनाकारण वाद घालण्यास सुरुवात केली. फिर्यादी याने त्याला बोलण्यात हस्तक्षेप करु नकोस, असे सांगितले असता राजेंद्रने संतापून फिर्यादी यास शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण केली. यानंतर घरातील पलंगाखाली लपवून ठेवलेला कोयता काढून त्याने फिर्यादी याच्या डोक्यात, मानेवर व डाव्या हातावर वार करुन जबर मारहाण केली. त्यामुळे फिर्यादी गंभीर जखमी झाला.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात प्रफुल्ल आल्हाट यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राजेंद्र आल्हाट याच्या विरुद्ध बी एन एस ११८ (१), ११५ (२), ३५१ (२), ३५२, भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार लगड हे करीत आहेत.

# जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता ६ वीच्या प्रवेशासाठी १३ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

नगर - सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात जवाहर नवोदय विद्यालय, टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर येथे इयत्ता ६ वीमध्ये निवड चाचणीद्वारे प्रवेश घेण्यासाठी ऑनलाईन नोंदणी सुरू करण्यात आली असून, नोंदणीची अंतिम मुदत १३ ऑगस्ट पर्यंत वाढविण्यात आली आहे. नोंदणीसाठी https://cbseitms.rcil.gov.in/nvs या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन नवोदय विद्यालयाच्या प्राचार्यांनी केले आहे.

# मिराबाई वामन पाटील यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - भवानीनगर येथील रहिवाशी मिराबाई रामदास वामन पाटील (वय ७५) यांचे १ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातावंडे असा परिवार आहे. प्रा.रामदास वामन पाटील यांच्या पत्नी होत. तर अ‍ॅड.गणेश रामदास वामन पाटील यांच्या मातोश्री होत्या.

# चंद्रशेखर पंतवैद्य यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील सेवानिवृत्त विंग कमांडर व सुदर्शन प्रभात स्वयंसेवक शाखेचे ज्येष्ठ स्वयंसेवक चंद्रशेखर नारायण पंतवैद्य (वय ८६) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, बहिण, सुना, नातवंडे असा परिवार आहे. जयदीप व संदीप पंतवैद्य यांचे वडील, डॉ.उषा पंतवैद्य यांचे थोरले बंधू होत.

# अहमदनगर जिल्हा अ‍ॅथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने १६ व १७ ऑगस्ट ला जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेचे आयोजन

### ऑनलाईन नाव नोंदणीचे आवाहन

नगर - अहमदनगर जिल्हा अ‍ॅथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने प्रवरा पब्लिक स्कूल प्रवरानगर येथे १६ व १७ ऑगस्ट रोजी जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १४, १६, १८, २० वर्ष वयोगटातील मुले व मुलींच्या मैदानी स्पर्धा होणार असून, या स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने नाव नोंदणी करण्याचे आवाहन छत्रपती पुरस्कार विजेते प्रा. सुनील जाधव व सचिव दिनेश भालेराव यांनी केले आहे.



या स्पर्धेच्या विविध गटातील प्रथम दोन क्रमांकाच्या खेळाडूंची जिल्हा संघात निवड होणार आहे. सप्टेंबर महिन्यात पुणे येथील बालेवाडी स्टेडियममध्ये होणाऱ्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत निवड झालेले खेळाडू आहिल्यानगर जिल्ह्याचे नेतृत्व करणार आहेत. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूंना १३ ऑगस्ट पर्यंत ऑनलाइन नोंदणी करण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंनी आपल्या सोबत मूळ जन्म दाखला व आधार कार्ड सोबत ठेवणे आवश्यक आहे. या स्पर्धेत फक्त अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंनी सहभाग नोंदविण्याचे असोसिएशनच्या वतीने म्हटले आहे. ही स्पर्धा ज्यांचे आधार कार्ड अहिल्यानगर जिल्ह्याचे असेल अशा स्पर्धकांना सहभाग घेता येणार आहे. स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडूंना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ.बी.बी. अंबाडे, डॉ. उत्तम अनाप, रमेश दळे, रमेश वाघमारे, राहुल काळे व सर्व क्रीडा शिक्षक व मार्गदर्शक परिश्रम घेत आहेत. अधिक माहितीसाठी दिनेश भालेराव ९२२६२३८५३६, श्रीरामसेतू आवारी ९३२२०१५०४६, जगन गवांदे ९८८१३२८१८६ व रावसाहेब मोरकर ९६५७५६५४५६ यांना संपर्क साधण्याचे म्हटले आहे.



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या कर्मचारी नागरी पतसंस्थेतर्फे अभिवादन करण्यात आले. (छाया : लहू दळवी)

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त मनपा कर्मचारी पतसंस्थेतर्फे अभिवादन

### समतेसाठी संघर्ष करणाऱ्या अण्णाभाऊंचे विचार आजही प्रेरणादायी : विकास गीते

नगर - समाजातील उपेक्षित, कष्टकरी आणि श्रमिक वर्गाच्या जीवनात न्याय, हक्क आणि परिवर्तन घडवून आणण्यासाठी आपल्या साहित्यातून आणि पोवाड्यांतून समाजप्रबोधन करणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित यांच्यावतीने पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन विकास गीते बोलत होते. ते म्हणाले, अण्णाभाऊ साठे हे केवळ एक साहित्यिक नव्हते, तर ते समतेसाठी धगधगतं आंदोलन होते. त्यांनी आपल्या साहित्यातून उपेक्षितांच्या भावना मांडल्या, त्यांच्या व्यथा जगासमोर मांडल्या आणि परिवर्तनाचा आवाज उठवला. त्यांच्या विचारांमधून आजची युवा पिढी प्रेरणा घेऊ शकते.

अहिल्यानगर महापालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्यावतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमास व्हाईस चेअरमन उषाताई वैराळ, जेष्ठ संचालक बाबासाहेब मुदगल, तज्ञ संचालक जितेंद्र सारसर, संचालक बाळासाहेब पवार, सतीश ताठे, श्रीधर देशपांडे, कैलास चावरे, बाळासाहेब गंगेकर, किशोर कानडे, अजय कांबळे, विजय कोतकर, गुलाब गाडे, बलराज गायकवाड, संचालिका प्रमिला पवार, कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी आदी पदाधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# कौटूंबिक न्यायालय वकील संघाने कामकाजावर बहिष्कार टाकत नोंदवला वकिलावरील हल्ल्याचा निषेध

नगर - श्रीरामपुर येथील सत्र न्यायालयात वकीली करणारे अ‍ॅड. दिलीप औताडे यांच्यावर न्यायालयीन कामकाज चालु असतांना विरोधी पक्षकाराने केलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ अहिल्यानगर जिल्हा कौटुंबिक न्यायालयातील वकिलांनी १ ऑगस्ट रोजी कामकाजात सहभाग न घेता या घटनेचा निषेध नोंदवला.

कौटूंबिक न्यायालय वकील संघाची महत्वाची बैठक ३१ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता होऊन त्यामध्ये श्रीरामपुर न्यायालयातील वकील दिलीप औताडे यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध व्यक्त करण्यसाठी कौटूंबिक न्यायालय वकील संघ १ ऑगस्ट रोजी कामकाजात सहभागी होणार नाही अशा प्रकारचा ठराव संमत करण्यात आला.

त्यानंतर वकील संघाने कौटूंबिक न्यायालयाचे न्यायाधिश यांना निवेदन देत कौटुंबिक न्यायालयातील वकील संघाचे सदस्य कामकाजामध्ये सहभाग नोंदविणार नाही. त्यामुळे त्यांचे आज रोजी असणारे केसेस मध्ये कोणत्याही प्रकारचे विरुध्द आदेश करण्यात येऊ नयेत अशी विनंती केली असल्याची माहिती कौटूंबिक न्यायालय वकील संघाचे अध्यक्ष अ‍ॅड. लक्ष्मण कचरे व उपाध्यक्ष सुरेश लगड यांनी दिली.

# घरासमोर लावलेल्या दुचाकीची चोरी

नगर - घरासमोर रस्त्याच्या कडेला हँडेल लॉक करुन लावलेली रॉयल इन्फिल्ड कंपनीची बुलेट मोटारसायकल (क्र. एम एच १६ सी यु १५१६) अज्ञात चोरट्याने नजर चुकवून चोरुन नेली. ही घटना सावेडी परिसरातील कॉटेज कॉर्नर येथील विठ्ठल पार्क येथे २९ जुलै रात्री ११ ते ३०जुलै रोजी सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यान घडली.

याप्रकरणी नाना भिमराव साबळे (वय ४३, रा. विठ्ठलपार्क, कॉटेज कॉर्नर, सावेडी, अ नगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (ब) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार योगेश चव्हाण हे करीत आहेत.

# जेऊर येथून चार गोवंशीय जनावरांची चोरी

नगर - घरासमोरील गोठ्यात बांधलेले सुमारे ६० हजार रुपये किमतीचे चार गोवंशीय जनावरे अज्ञात चोरट्याने दावे सोडून चोरुन नेल्याची घटना नगर तालुक्यातील जेऊर बायजाबाईचे येथे १० जुलै रोजी रात्री ११.३० ते ११ जुलै रोजी सकाळी ७.३० वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत अबरार अमीर शेख (रा. जेऊर बायजाबाईचे तालुका नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. फिर्यादीत म्हटले आहे की फिर्यादी यांच्या घरासमोरील गोठ्यात बांधलेले, तीस हजार रुपये किमतीच्या दोन जर्सी गाय , वीस हजार रुपये किमतीची एक म्हैस , दहा हजार रुपये किमतीचे म्हशीचे एक टोणगे असे ६० हजार रुपये किमतीचे जनावरे अज्ञात चोरट्याने चोरुन नेले.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अबरार शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला पुढील तपास सहाय्यक फौजदार खेडकर हे करीत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### ब्लुबेरी खाण्याचे फायदे

* ब्लुबेरी खाण्याने वाढलेले वय कळत नाही. दृष्टी चांगली राहते. स्मरणशक्ती तल्लख राहण्यास मदत होते. हृदयरोगाची शक्यता कमी होते. पण ब्लुबेरी अधिक खावू नये. कॉलरासारख्या आजारावर डाळिंबाचा ज्यूस उपयुक्त ठरतो. शुगर असलेल्या व्यक्तीने डाळिंबाचा ज्यूस प्यायल्यास कोरोनरी नावाच्या आजारापासून बचाव होतो.

* अनेक लोकांना जेवताना किंवा जेवण्याच्या आधी किंवा नंतर कॉफी पिण्याची सवय असते. असे करणे नुकसान कारत ठरते कारण याने शरीरात आयरनचे शोषण बाधित होत. आपण ॲनिमिक असाल तर हे अधिक आवश्यक होऊन जाते.

## पाककला

### सुंठाच्या मठऱ्या

**साहित्य** – सुंठ पूड ७० ग्रॅम, ओवा १ टीस्पून, मकाणे १०० ग्रॅम, रवा २५० ग्रॅम, साजूक तूप ३०० ग्रॅम, मीठ व तळणीस तेल.

**कृती** – तुपात सुंठ पूड कालवा व झाकण घालून एक आठवडा तसेच ठेवा. मकाणे कुटा व बारीक पूड करा. तिच्यात मिसळा. सुंठ मिसळलेल्या तुपातून १ वाटी तूप काढून घ्या. रवा मिश्रणात ओवा व मीठ घाला व हाताने फेटून घ्या. मग त्यात सुंठ व उरलेले तूप ओता व घट्ट कणिक मळा. कढईत तेल तापत ठेवा. त्यात छोट्या-छोट्या पुऱ्या लाटून तळा.

## सल्ला

घरात वापरावयाची औषधांची एक्स्पायरी डेट संपली असेल, तर ती कचऱ्यात टाकण्याऐवजी कुंड्यामध्ये टाका. त्यामुळे रोपे झपाट्याने वाढतील.

## वास्तू

जेवण करण्याचाही अशाच प्रकारचा एक नियम आहे. म्हणजे ताट पूर्व-दक्षिण दिशेकडे ठेवावे आणि पूर्वाभिमुख होऊन जेवण करावे.

## सौंदर्य

* टाळूच्या भागावर ऑलिव्ह ऑईल चोळून मसाज केल्यावर उबदार टॉवेलने केस १०/१५ मिनिटे बांधून ठेवावेत.

* चेहऱ्याचे स्क्रबींग करण्यासाठी टोमॅटोचा टुकडा घेऊन, चेहऱ्यावर मसाज करावा. यामुळे त्वचा स्वच्छ होऊन रंग उजळतो.

* चेहऱ्याचा तेलकटपणा जाण्यासाठी ज्येष्ठमध पूड पाण्यात कालवून रात्री लावावी.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. २ ऑगस्ट २०२५

**आश्लेषा रवि, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष, विशाखा अहोरात्र, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३४ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : मित्र आपणास मदत करतील व काही आवश्यक कार्ये पूर्ण होतील. मित्रांचा सहयोग मिळेल. शुभ वार्ता देखील मिळतील. एखादे कार्य झाल्यामुळे आनंदाचा अनुभव येईल.

**वृषभ** : मोठ्यांचा आधार मिळाल्याने कार्य पूर्ण होतील. वैवाहिक जीवनात स्थिती अनुकूल राहील. अधिकारी वर्गाचे पाठबळ मिळेल. शत्रू पराभूत होतील.

**मिथुन** : व्यापार-व्यवसायात स्थिती सुखद राहील. मित्रांची मदत मिळेल. आरोग्याची काळजी बाळगणे आवश्यक राहील. व्यापार-व्यवसायात परिस्थिती मध्यम राहील.

**कर्क** : घरात किंवा पैशांमध्ये वाढ झाल्याने आपणास आनंद मिळेल. आपला निष्काळजी दृष्टीकोन आज चांगला ठरणार नाही. व्यापारात आपणास कमी प्राप्ती होईल पण नुकसान मोठे होईल.

**सिंह** : आपल्या आत्मविश्वासाचा स्तर वाढविण्याचा प्रयत्न करा. धार्मिक भावना वाढेल. सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल सहकार्यांबरोबर प्रतिष्ठा वाढेल. खाण्या-पिण्यात काळजी घ्या.

**कन्या** : अधिक श्रम करावे लागतील. व्यापार-व्यवसाय व आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगावी लागेल. शत्रू पक्षापासून सावध राहा. संभाषणात सावधगिरी बाळगा. सामाजिक क्षेत्रांमध्ये अजून काही विशेष कार्ये होणार नाही.

**तुळ** : एखादी व्यक्ती निष्कारण आपल्याला त्रास देईल. गृह भूमीसंबंधी विषयांमध्ये लाभ मिळेल. खरेदी-विक्रीत लाभ मिळण्याची स्थिती बनेल.

**वृश्चिक** : व्यवसायासाठी उत्तम वेळ. नवीन कामात यश मिळेल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. शत्रू प्रभावहीन पडतील. आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे वादाला कारण ठरू शकते.

**धनु** : आज रात्री विश्रांती घ्या. घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. शत्रू प्रभावहीन ठरतील. कौटुंबिक वातावरण सुखद राहील. आर्थिक प्रयत्नांमध्ये स्थिती अनुकूल राहील. सौंदर्याकडे आकर्षण वाढेल.


**मकर** : आजचा दिवस आपल्यासाठी नवीन सुरुवात करणे किंवा व्यक्तीमत्वाचे ध्येय निर्धारित करण्यात सहायक ठरेल. आपल्या जीवनातील इच्छित वस्तूवर लक्ष द्या.

**कुंभ** : नोकरदार व्यक्तींनी कार्यात सहयोग घेऊन चालावे. भविष्यात मान-सन्मानात वाढ होईल. कौटुंबिक प्रश्नांचे निराकरण होईल. मित्रांकडून सहयोग मिळेल. व्यापार-व्यवसायात स्थितीत सुधार होईल.

**मीन** : नोकरदार व व्यापारी बंधूंना लाभ मिळेल. नेहमीपेक्षा अधिक चांगले काही घडण्यासाठी आपणास आपल्या कामात एकाग्रता वाढवण्याची आवश्यकता आहे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२३३ सौ.शैलजा कुलकर्णी




**उभे शब्द :-** १) संपत्ती, मालमत्ता, धन ३) निष्णात, कुशल, प्रवीण ५) भुतांचा राजा ७) सद्वर्तन, उदारता, शील ८) पूर्व दिशा १०) एक विषारी साप ११) तीव्र उठणारी वेदना, कळ, तिडीक १२) साथ, सोबत, बरोबर १३) नूतन, नवा १४) पिता, बाप, तात, जनक १६) आकाश, गगन, अंबर १७) ज्याच्या नेतृत्वाखाली भारताने विश्वचषक जिंकला असा भारतीय अष्टपैलू खेळाडू २०) प्राक्तन, प्रारब्ध, दैव २१) सूट, डिस्काऊंट

**आडवे शब्द :-** १) अपत्य, संतान, मूलबाळ २) हक्क सांगणारा, फिर्यादी, उत्तराधिकारी ३) गुप्त शोध, टेहळणी, पहारा ४) जीव गेलेला, मेलेला, मृत ६) अकबराच्या दरबारातील प्रसिद्ध गायक ९) चिकट रस किंवा दूध १०) एकमेकांचे दोन्ही हात धरुन फेर मारण्याचा खेळ ११) वर्ष, साल, शक १२) वाढविणे, पालनपोषण १५) खोड, दुर्गुण १६) आश्चर्य, अचंबा १८) सुईद्वारे शरीरात सोडले जाणारे औषध, जखमेतून वाहणारा द्रव १९) ईश्वर, देवता, राजा

**शब्दगंध क्र. ७२३२ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. ११९९ चे उत्तर**



# ****** मुलांचे विश्व ******

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : कार्यशक्ती आणि इच्छाशक्ती प्राप्त करा; खडतर परिश्रम करा; म्हणजे तुम्ही निश्चित ध्येयाप्रत पोहोचू शकाल. – **स्वामी विवेकानंद.**

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मार लागल्यास डोक्याला टेंगूळ का येते?

कोणी झाडावरून पडतो, कोणाला दगड लागतो, कोणी पाय घसरून पडतो; हे झाल्यावर सर्वांनाच दुखते. काही वेळा सूजही येते. डोक्याला लागल्यास येणारी सूज म्हणजे टेंगूळ. असे का होते ते आता समजावून घेऊ.

इजा झाल्यास वा दुखापत झाल्यास शरीरात दाहाची प्रक्रिया चालू होते. दुखापतीमुळे पेशी दुखावल्या जातात किंवा मरतात. या मृत पेशींमधून काही रासायनिक पदार्थ बाहेर पडतात. या पदार्थांना प्रतिसाद म्हणून त्या भागाचा रक्तपुरवठा वाढवला जातो. व तेथे विशिष्ट प्रकारच्या पांढऱ्या पेशी गोळा होतात. या रक्तपेशी मृतपेशी तसेच तेथील (असल्यास) सूक्ष्म जीवजंतूना गिळून टाकतात. काही वेळा या पेशी रासायनिक पदार्थ निर्माण करून जीवजंतूंचा नायनाट करतात. दुखापत झालेला भाग लाल होणे, तेथील तापमान वाढणे, तसेच तेथे सूज येणे ही लक्षणे उपरोक्त कारणांमुळे होतात.

डोक्यामध्ये कवटी व त्याभोवती घट्ट त्वचा असते. या रचनेमुळे सुजलेला भाग जास्त प्रकर्षाने जाणवतो. मांडी, हात व मांसल भागात मात्र अशी सूज इतकी प्रकर्षाने जाणवत नाही. म्हणून डोक्याला लागले की टेंगूळ येते. काही दिवसात शरीरातील पांढऱ्या रक्तपेशी आपले काम पूर्ण करतात व टेंगूळ दिसेनासे होते. दाह कमी करणाऱ्या गोळ्यांनीही वेदना व सूज कमी करता येते.


### लढता लढता मेलेले बरे

एका गल्लीतला कुत्रा सहज फेरफटका मारावा म्हणून एका दुसऱ्या गल्लीत फिरायला गेला असता हा कोण उपटसुंभ आपल्या हद्दीत घुसला असा विचार करीत त्या गल्लीतली पाच पंचवीस कुत्री त्या कुत्र्याच्या पाठी लागली, तेव्हा भीतीने तो कुत्रा पळू लागला.

पण शेवटी पळून पळून थकल्याने आपण आता यांच्या तावडीतून सुटत नाही. आपण नक्कीच प्राणाला मुकू, तेव्हा यांच्या तावडीत सापडून मरण येणारच असेल तर लढून मेलेले काय वाईट? असा विचार मनात येऊन तो कुत्रा गर्रकन पाठीमागे फिरला आणि मोठमोठ्याने गुरकावून त्या कुत्र्यांच्या कळपावर तुटून पडला. त्याचा तो आवेश पाहून धावून आलेले कुत्रे भीतीने पळून गेले.

**तात्पर्य** : संकटाचा सामना धैर्याने केल्यास संकटातून सुटका होते.

# जीवन का अमृत (भाग १)



सचखंड में चेतनता ही चेतनता है, पारब्रह्म में माया का झीना सा परदा है, ब्रह्म में माया और चेतनता बराबर है, अंड में चेतनता कम और माया अधिक है और पिण्ड के मंडल में, जिसमें हम अपना जीवन व्यतीत कर रहे हैं, जिसमें धरती है, चन्द्रमा है, सितारे हैं, सूर्य है और अरबों-खरबों planets (ग्रह) हैं, इसमें माया ही माया है और चेतनता बहुत ही कम है। जब प्रभु ने अपने अंशों (आत्माओं) को इन मंडलों में रहने के लिए भेजा, तो उन मंडलों में रहने के लिए उन्हें (आत्माओं को) एक शरीर धारण करना पड़ा। पारब्रह्म में हमारी आत्मा पर झीना सा परदा होता है, ब्रह्मंड में ब्रह्मंडी शरीर होता है, अंड में अंडी शरीर होता है और पिंड में पिंडी शरीर होता है, जिसमें हम इन्द्रियों के द्वारा कार्य करते हैं। इस पिंड के मंडल में कार्य करने के लिए हमें पाँच इन्द्रियाँ दी गई हैं- आँखों से हम देखते हैं, कानों से हम सुनते हैं,

### गुरू और परमात्मा

जबान से हम चखते हैं, नाक से सूंघते हैं और स्पर्श की इन्द्री है। इंसान जब इस धरती पर आता है, तो वह बहुत लाचार होता है। हमारी आत्मा चाहती है कि उसका मिलाप प्रभु से हो जाए, लेकिन हमारा मन इन्द्रियों के जरिये हमें दुनिया में फँसाये रखता है और आत्मा भी मन के आधीन होकर भोगों में लम्पट रहती है। इस प्रकार हम ८४ लाख जियाजून के चक्कर में फंसे रहते हैं। शुरू-शुरू में हमारी आत्मा इन मंडलों में आकर रहती थी और बाद में प्रभु के पास सीधी चली जाती थी। लेकिन प्रभु ने अपनी मौज में आकर काल को वरदान दे दिया कि आत्मा अपने स्रोत को भूल जाए और अपने कर्मों के अनुसार ८४ लाख जियाजून में चक्कर लगाती रहे। उसी वरदान के कारण हमारी आत्मा तड़पती रहती है, ८४ लाख जियाजून में ही फँसी रहती है।

यदि हम अपने चाप की तुलना पशुओं के बच्चों से करें, तो हमें मालूम होता है कि वे खाना, पीना, चलना बहुत जल्दी सीख जाते हैं। यदि हम अपने आप की तुलना पशुओं के बच्चों से करें, तो हमें मालूम होता है कि वे खाना, पीना, चलना बहुत जल्दी सीख जाते हैं। जब हमारी आत्मा इंसानी शरीर धारण करती है, तो माँ-बाप उसे चलना सिखाते हैं, पढ़ने-लिखने भेजते हैं और जैसे-जैसे हम बड़े होते हैं, हमें नई-नई चीजें सीखनी पड़ती हैं और हमें कई प्रकार की जिम्मेदारियों को निभाना पड़ता है। यदि हम हिन्दुस्तान में जन्म लेते हैं, तो हमें हिन्दी बहुत जल्दी आ जाती है और अमरीका में पैदा होते हैं, तो हमें अंग्रेज़ी बहुत जल्दी आ जाती है। इस प्रकार २० से २५ वर्ष हमारे पढ़ाई-लिखाई में व्यतीत हो जाते हैं, ताकि हम इस काबिल हो सकें कि अपना जीवन बसर कर सकें। सारी जिंदगी हम कुछ न कुछ सीखते ही रहते हैं। माया ने बहुत बड़ा जाल बिछा रखा है। हममें से कोई भी माया के जाल को पूरी तरह समझ नहीं सकता है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

हमें तो बस उसे प्राप्त करना है। यदि हम सीधे-सरल एवं निष्कपट बने रहते हैं, तो हमें सबकुछ मिलेगा, जो भी हमें चाहिए। बहुत सी परिस्थितियाँ हमारे सामने आएँगी, लेकिन जब हम स्थिर और अंतर्मुखी हो जाते हैं, हम घटनाओं से सीख सकते हैं और सुस्थिर हो सकते हैं। मन शांत हो जाता है और तन शीतल एवं सौम्य।

शुद्ध सकारात्मक विचारों से हमें शांति मिलती है। देह-सजग इच्छाओं से उत्पन्न विचार अशांति एवं विकलता लाते हैं। यह कितनी सीधी-सादी बात है।

जब हमारे विचार इतने सशक्त हो जाते हैं कि लोग और परिस्थितियाँ हमें प्रभावित न कर सकें, ईश्वर हमारे साथ मौजूद रहता है और हम कभी पराजित नहीं होंगे। फिर हम हर एक के साथ शांति और प्रेम से परस्पर व्यवहार कर सकते हैं। मैं समझती हूँ कि मेरे जीवन का एक ही आधार रहा है, कल जो हुआ या एक क्षण पहले हुए को याद न

### आज्ञा चक्र

रखना। मुझे केवल उसके बारे में सोचना होता है, जो मुझे अभी करना है।

अपनी भूलों या दूसरों की गलतियों को याद न रखें। सच्चे बनें और विश्वास करना सीखें। फिर ईश्वर के सखा के रुप में आप इस तन और इस थके-माँदे दकियानूसी संसार के प्रति अपनी अभ्यासिक आसक्ति समेत अपनी सभी पुरानी आदतों को छोड सकेंगे। आपको महसूस होगा कि आप एक खूबसूरत जीवन, एक शाश्वत जीवन जी रहे हैं। आपको सृष्टि की सुंदरता और चिरंतनता के अंदर अपनी भूमिका का ज्ञान हो जाएगा।

'चल उड जा रे पंछी
कि अब यह देश हुआ बेगाना!'

दादी जानकी का पूरा जीवन ऐसे अध्ययन और अभ्यास को समर्पित रहा है, जो किसी भी व्यक्ति को उन्नत कर सकता है। वरिष्ठ या श्रेष्ठ होने के अर्थ में नहीं, बल्कि सेवा करने योग्य होने के अर्थ में, जब हम ईश्वर से सहारा लेते हैं, जो वह हमें खुशी से देता है, हम न केवल यह महसूस करते है कि 'मैं ईश्वर की हूँ', बल्कि यह भी कि 'ईश्वर मेरा है' । दादी कहती हैं,

''परमात्मा आपकी तरफ हो, यह कोई मामूली बात नहीं है।'' इसका तात्पर्य है कि हम लोगों तथा हालात के प्रति भावनात्मक रुप से प्रतिक्रियात्मक होने से ऊपर उठने की क्षमता रखते हैं। परिणामस्वरुप हम समाधान खोजने की पहल करने में सक्रियता को बढावा देने या सृजनशील होने की क्षमता रखते हैं। इस समय की यही विशेष आवश्यकता होती है।

ब्रह्म कुमारियों के विचार में, जैसे-जैसे समय का बदलना जारी रहता है, मानवजाति एक बार पुन: उस शुद्ध, स्वर्णयुगीन संसार का अनुभव करेगी।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

रस्त्यावर औषधे विकणारा वैदू म्हणत होता.
'बंधूंनो!... गेल्या पंचवीस वर्षांपासून मी हे औषध विकत आलेलो आहे. पण आजपर्यंत या औषधाबद्दल एकही तक्रार करणारा भेटला नाही.'
हे ऐकल्यानंतर गर्दीतून एक आवाज आला,
'वर गेलेली माणसे कधी तक्रार करायला येत असतात का?'

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* क्रिकेट व फुटबॉल खेळाचा जन्मदाता कोणता देश आहे?
– इंग्लंड

* स्ट्रेट ड्राईव्ह, पॅडल स्विप या संज्ञा कोणत्या खेळाशी संबंधित आहेत?
– क्रिकेट

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# काय खावे?

२) वेलचीमध्ये असणाऱ्या नैसर्गिक घटकांमुळे शरीरातील वाईट कोलेस्टेरॉल (LDL) कमी होण्यास मदत होते.

३) मानसिक ताणतणाव निर्माण होऊन जर नैराश्य जाणवत असेल, तर अशा वेळी दुधामधून वेलचीपूड व खडीसाखर घ्यावी. याने मेंदूवरील ताण कमी होऊन नैराश्यावस्था कमी होते.

४) सौंदर्यविकारांमध्येही वेलचीपासून तयार होणाऱ्या तेलाचा वापर केला जातो. याने त्वचेवरील काळे डाग, रक्तदूषित होऊन होणारे विकार, तारुण्यपीटिका कमी होतात.

५) भोजनानंतर मुखशुद्धी म्हणून वेलची खावी किंवा पानांच्या विड्यातून वेलची खाल्ल्यास मुखदुर्गंधी दूर होते व घेतलेल्या अन्नाचे पचन व्यवस्थित होते.

६) विविध दुग्धजन्य पदार्थ, मिठाई, सरबत यामध्ये वेलचीचा वापर करावा. याने पदार्थ रुचकर होऊन त्या पदार्थांचे पचन सुलभरीत्या होते.

७) अपचन, आम्लपित्त, भूक मंदावणे, पोटदुखी, गॅसेस या सर्व विकारांवर वेलचीपूड, आवळा सरबत किंवा लिंबू सरबतामध्ये टाकून घेतल्यास वरील लक्षणे कमी होतात.

८) लघवीला जळजळ होत असेल, तसेच

### वेलची

हातापायांची आग होत असेल किंवा संपूर्ण शरीरामध्ये उष्णता जाणवत असेल तर अशा वेळी आवळ्याच्या रसाबरोबर वेलचीचे सेवन करावे. याने उष्णतेचा त्रास कमी होईल.

९) वेलचीमध्ये अनेक औषधी गुणधर्म असल्याने वेलचीच्या बिया, बदाम, जायपत्री, साखर आणि गायीचे लोणी एकत्र करून सकाळच्या वेळी नियमित घेतल्यास सप्तधातूंची पुष्टी होते.

१०) वंध्यत्व असणाऱ्या पुरुषांनी वेलची, बदाम, अक्रोड, खडीसाखर दुधामध्ये टाकून नियमित सेवन केल्यास शुक्रजंतूंचे प्रमाण वाढण्यास मदत होते. शीघ्रपतन, शुक्रधातू पातळ असणे या तक्रारी दूर होतात.

११) कलकत्ता येथील चित्तरंजन नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट'मध्ये आतडे व गुदमार्गाच्या कॅन्सरग्रस्त रुग्णांमध्ये वेलचीचा उपयोग औषध स्वरूपात केल्यास रुग्णांची व्याधी प्रतिकारशक्ती वाढून आजार आटोक्यात राहण्यास मदत होते, हे सिद्ध केले आहे.

**सावधानता** – गर्भावस्थेमध्ये गर्भवतीने वेलचीचे अति प्रमाणात सेवन केल्यास गर्भपात होण्याची शक्यता असते म्हणून अगदी अल्प मात्रेतच वेलचीचे सेवन करावे.

### लिंबू

प्रत्येकाच्या स्वयंपाकघरात आवर्जून सापडणारे लिंबूफळ होय. लिंबू स्वादाने आंबट असूनही बहुगुणी व उपयोगी फळ आहे. मराठीमध्ये 'लिंबू', हिंदीमध्ये 'निंबू', संस्कृतमध्ये 'निम्बुक', इंग्रजीमध्ये 'लाईम', शास्त्रीय भाषेत 'सायट्रस सिडा' (Citrus cida) या नावाने प्रसिद्ध असलेले लिंबू 'रुटेसी' कुळातील आहे. गोलाकार आणि अंडाकृती या दोन प्रकारांत लिंबाची फळे पाहावयास मिळतात.

भारतामध्ये लिंबाची लागवड सर्व प्रदेशांमध्ये केली जाते. लिंबाचा रस रुचकर व पाचक असल्याने आमटी, भाजी, लोणचे, सरबत, मुरांबा अशा विविध आहारीय पदार्थांसाठी त्याचा वापर केला जातो. आयुर्वेदामध्येही अनेक औषधे निर्माण करताना लिंबाचा वापर करतात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# 'आनंदऋषीजी हॉस्पिटल'मध्ये ९ सप्टेंबर पर्यंत मोफत महाआरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन

## अँजिओग्राफी ३ हजार, सिटी स्कॅन १२५० रुपयांत, एमआरआय २५०० रुपयात व सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या १२५ व्या जन्मजयंती निमित्त जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल एण्ड हार्ट सर्जरी सेंटर येथे २ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर या कालावधीत विविध मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सकाळी १० ते दुपारी २ या कालावधीत रूग्ण तपासणी करण्यात येणार आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटलला एन.ए.बी.एच.मान्यता मिळालेली असून ही मान्यता असलेले नगर जिल्ह्यातील २६० बेडस्चे हे पहिलेच हॉस्पिटल आहे. आरोग्य सेवांचा लाभ या मोफत शिबिरांतून सर्वसामान्य रूग्णांना होणार आहे. एमआरआय तपासणी २५०० रुपये, सर्व प्रकारचे सिटी स्कॅन १२५० रुपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रुपये, डिजीटल एक्स रे तपासणी २५० रुपयात केली जाणार आहे. हॉस्पिटलमध्ये प्रशस्त व अतिप्रगत पॅथॉलॉजी विभाग, आंतरराष्ट्रीय दर्जाची ब्लड बँक, ३५ डायलेसिस मशिन कक्ष, परिपूर्ण फिजिओथेरपी विभाग आहे.

तपासणी शिबिराला २ ऑगस्ट रोजी सुरूवात होणार आहे. पहिल्या दिवशी मेंदू विकार व मेंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यात डोकेदुखी, अपस्मार, पॅरालिसिस, कंबरदुखी, नसांचे विकार, स्नायूंचे विकार, मेंदूतील जंतुसंसर्ग, मेंदूज्वर, स्मृतीभ्रंश इत्यादी आजारांची तपासणी व उपचार केले जातील. इ.इ.जी, इ.एम.जी, एन.सी.व्ही इत्यादी तपासण्या ५० टक्के सवलतीच्या दरात केल्या जाणार आहेत. मणक्यातील चकती सरकणे, झटके येणे, ट्रॉमा सर्जरी, मेंदूतील रक्तस्त्राव, स्लिपडिक्स आदी समस्यांवर उपचार शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. मेंदूविकार तज्ज्ञ डॉ.गौतम काळे, डॉ.अद्वैत गिते, डॉ.वैशाली कदम, न्यूरोसर्जन डॉ.विशाल भस्मे रूग्ण तपासणी करतील.

४ ऑगस्ट रोजी ब्लड प्रेशर, डायबेटीज व इतर सर्व आजारांवर निदान व तपासणी शिबीर होईल. साथीचे आजार व सर्वरोग निदान शिबिरात एम.डी.मेडीसीन डॉ.वसंत कटारिया, डॉ.गजेंद्र गिरी, डॉ.रविराज गवळी, डॉ. प्राजक्ता पारधे, डॉ.स्वप्निल शिंदे रूग्ण तपासणी करतील.

५ ऑगस्ट रोजी सवलतीच्या दरात जनरल शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. पेंडिक्स व इंगवायनल हर्निया शस्त्रक्रिया प्रत्येकी १० हजार रुपये, हायड्रोसील शस्त्रक्रिया ४ हजार रुपयांत केली जाणार आहे. औषध खर्च वेगळा असेल. जनरल सर्जन डॉ. प्रविण मुनोत, डॉ. विवेक भापकर रूग्ण तपासणी करून उपचार मार्गदर्शन करतील.

६ ऑगस्ट रोजी स्त्रीरोग, गर्भवती महिला आरोग्य तपासणी शिबीर होणार आहे. यात दुर्बिणीव्दारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, गर्भाशयाची पिशवी काढण्याची शस्त्रक्रिया, सिझेरियन प्रत्येकी १० हजार रुपयात केले जाईल. गर्भवती मातांची सोनोग्राफी, रक्त, लघवी इत्यादी तपासण्या शिबिरापासून पुढील महिनाभराच्या कालावधीत ५० टक्के सवलतीच्या दरात केल्या जातील. शिबिरातील गर्भवती मातांना बाळंतपणावेळी होणार्या फीमध्ये ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. या शिबिरात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.रवींद्र मुथा, डॉ.सोनल बोरुडे, डॉ.हिरल चौधरी रूग्ण तपासणी करतील.

८ ऑगस्ट रोजी कान, नाक, घसा व स्पीच थेरपी तपासणी शिबीर होणार आहे. हॉस्पिटल मध्ये ऑडिओमेट्री सुविधा उपलब्ध आहे. या शिबिरात डॉ.सुकेशिनी गाडेकर, डॉ .अतुल तुपे, डॉ.सूरज कर्डिले, वाचा व भाषा उपचार तज्ज्ञ अझर शेख रूग्ण तपासणी करणार आहेत.

१० ऑगस्ट रोजी मोफत नेत्ररोग तपासणी शिबीर होणार आहे. महावीर भवन येथील आनंदऋषीजी नेत्रालय येथे होणाऱ्या या शिबिरात अल्प दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येतील. डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ.अशोक



महाडिक, डॉ.संदीप राणे, डॉ. प्रतिक कटारिया, डॉ. विशाल तांबे, डॉ. किरण शिंदे, डॉ. नेहा भराडिया आदी तज्ज्ञ डॉक्टरांची टीम रूग्ण तपासणी व उपचार करतील. शिबिराच्या नाव नोंदणीसाठी संपर्क –८६८६४०१५१५.

११ ऑगस्ट रोजी कॅन्सर तपासणी शिबीर होणार आहे. यात घसा, फुफ्फुस, आतडे, तोंडाचा इत्यादी कॅन्सर तपासणी, स्त्रियांचे कॅन्सर तपासणी, स्त्रियांमधील स्तनाच्या कॅन्सरची तपासणी मॅमोग्राफी मशिनव्दारे करण्यात येईल. स्त्रियांच्या गर्भ पिशवीच्या कॅन्सरच्या तपासणीसाठी सवलतीच्या दरात पॅपस्मीयर तपासणी केली जाणार आहे. मॅमोग्राफी तपासणी फक्त १०० रुपयात करण्यात येणार आहे. या शिबिरात कॅन्सर सर्जन डॉ. अनिकेत शिंदे, डॉ. राहुल कांडेकर, कॅन्सर विकार तज्ज्ञ डॉ.लिझा बलसारा, फिजिशियन डॉ. गजेंद्र गिरी, डॉ. रविराज गवळी, डॉ. प्राजक्ता पारधे, सर्जन डॉ.विवेक भापकर, डॉ.प्रविण मुनोत, डॉ. भास्कर जाधव, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.रवींद्र मुथा, डॉ.सोनल बोरुडे, डॉ.हिरल चौधरी, रेडिओलॉजीस्ट डॉ. मितेश कटारिया, डॉ.भक्ती फलके, डॉ.सोनाली सोलट, डॉ.निखिता जैन (कटारिया), पॅथॉलॉजीस्ट डॉ.मुकुंद उंडे, डॉ.सारिका झरेकर, मायक्रोबायोलॉजीस्ट डॉ.नरेंद्र पाटील रूग्ण तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत.

१३ ऑगस्ट रोजी प्लॅस्टिक सर्जरी शिबीर होणार आहे. यात लहान मुलांच्या हाताच्या जन्मजात समस्या, व्यंग, मधुमेहामुळे होणार्या जुनाट जखमा, पायाच्या जखमा, दुभंगलेले ओठ, तुटलेले कान, चेहर्यावरील व्रण, तोंड, गाल, ओठ, जीभ, जबडा, सायनस, लाळ ग्रंथीच्या साध्या व कर्करोगाच्या गाठीचे निदान व उपचार मार्गदर्शन केले जाईल. तिखट आणि मसालेदार खाण्यात अडचण येणे, तोंडातील व्रण आदी समस्यांवर उपचार केले जाणार आहेत. प्लॅस्टिक सर्जन डॉ. आदित्य दमाणी आदित्य शिबिरात तपासणी व उपचार करणार आहेत.

१६ ऑगस्ट रोजी बालरोग तपासणी शिबीर होणार आहे. यात लहान मुलं, नवजात शिशुंचे आजार आणि तपासणी, लहान मुलांच्या हर्निया, हायड्रोसील, फिमोसिस, ंडिसेंड टेस्टीस इत्यादी शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. बालरोग तज्ज्ञ डॉ.वैभवी वंजारे, डॉ. दीपी अग्रवाल, डॉ.विजय साठे, डॉ.गणेश गव्हाणे, पिडियाट्रीक सर्जन डॉ. रूपेश सिकची रूग्ण तपासणी करतील.

१७ ऑगस्ट रोजी हृदयरोग तपासणी शिबीर होणार आहे. यात ंजिओग्राफी तपासणी ३ हजार रुपयांत केली जाणार आहे. हृदय शस्त्रक्रिया बायपास, हृदयातील झडप बदलणे, छिद्रे बुजवणे, लहान मुलांच्या हृदयशस्त्रक्रिया व अँजिओप्लास्टी महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत मोफत केल्या जाणार आहेत. शिबिरात कार्डियाक सर्जन डॉ.स्वप्नील कर्णे, डॉ.श्रीरंग रानडे, डॉ. इमरान पटेल, डॉ. देखणे, डॉ.अवस्थी, एम डी मेडिसीन डॉ.वसंत कटारिया, डॉ.आवस्ती, डॉ. विनोद चिंधे, कार्डिओलॉजीस्ट डॉ. राहुल अग्रवाल, डॉ.अमित थोपटे, डॉ .अनिकेत कटारिया, कार्डियाक अनेस्थेटिस्ट डॉ.राहुल एरंडे, डॉ. विनय छल्लाणी, डॉ.गजेंद्र गिरी, डॉ.रविराज गवळी, डॉ.प्राजक्ता पारधे, डॉ. स्वप्निल शिंदे रूग्ण तपासणी करतील.

२९ ऑगस्ट रोजी दुर्बिणीद्वारे बिनटाका शस्त्रक्रिया शिबिराने होणार आहे. यात लॅप्रोस्कोपीव्दारे पोटातील, बेंबी, हर्नियाची शस्त्रक्रिया १० हजार रुपये, पित्ताशय काढणे शस्त्रक्रिया १५ हजार रुपये, स्त्रियांच्या गर्भाशयाची पिशवी काढणे १० हजार रुपये, स्टॅपलर लेझर पाईल्स शस्त्रक्रिया १५ हजार रुपये, अपेंडिक्स शस्त्रक्रिया ४ हजार रुपये, स्त्रीयांचे वंध्यत्व तपासणीसाठी ट्युबल पेटेन्सी टेस्ट २ हजार रुपये, स्त्रीयांची कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया ३ हजार रुपयांत केली जाईल. सर्व शस्त्रक्रियांसाठी औषधे, आयसीयुचा खर्च वेगळा असेल. या शिबिरात जनरल व लॅप्रोस्क्रोपिक सर्जन डॉ.भास्कर जाधव, डॉ. राहुल कांडेकर, डॉ.महेश घुगे, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.रवींद्र मुथा, डॉ. सोनल बोरुडे, डॉ.हिरल चौधरी रूग्ण तपासणी करतील.

३० ऑगस्ट रोजी अस्थिरोग तपासणी, मणके व सांधेबदली शस्त्रक्रिया शिबीर होणार आहे. यात इंपोर्टेड इम्प्लांटसह संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण, संपूर्ण खुबा प्रत्यारोपण इंपोर्टेड इम्प्लांटसह ६५ हजार रुपयांपुढे केले जाणार आहे. औषध खर्च वेगळा असणार आहे. शिबिरात अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.विशाल शिंदे, डॉ. रोहन धोत्रे, स्पाईन सर्जन डॉ. अमित सुराणा, डॉ. अक्षय गादिया रुग्ण तपासणी करणार आहेत.

३१ ऑगस्ट रोजी त्वचा रोग तपासणी शिबीर होणार आहे. मुरुम, पांढरे डाग, इसब, गजकर्ण, नायटा, केसांच्या, नखांच्या समस्या, सोरियासीस, चामखीळ, कुष्ठरोगावरील तपासणी व उपचार करण्यात येतील. त्वचारोग तज्ज्ञ डॉ.भास्कर पालवे, डॉ.अमित शिंदे रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन करतील.

४ सप्टेंबर रोजी पोटाचे आजार तपासणी शिबिर होईल. यात यकृत, स्वादूपिंड विकार, पोटातील कॅन्सरच्या गाठी, आतड्याचे विकार, पोटदुखी, सिडिटी, आम्लपित्त, लिव्हर इन्फेक्शन, पचनक्रियेचे विकार, अपचन, पित्ताशयातील खडे, काविळ तपासणी केली जाईल. पोटविकार तज्ज्ञ डॉ. राहुल कांडेकर, डॉ.राजेंद्र गुंजाळ रूग्ण तपासणी करणार आहेत.

८ सप्टेंबर रोजी किडनी आजार तपासणी शिबिर होणार आहे. यात अंगावर सूज येणे, लघवी कमी अथवा लाल होणे, किडनी जंतू संसर्ग, डायलेसिस रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन केले जाणार आहे. महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत डायलेसिस मोफत केले जाईल. यात नेफ्रोलॉजीस्ट डॉ.गोविंद कासट, डॉ.प्राजक्ता पारधे रूग्ण तपासणी करतील.

९ सप्टेंबर रोजी शिबिरांची सांगता एंडो युरोलॉजीकल (मूत्रपिंड, मूत्रमार्ग, मूत्राशय), स्टोन तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराने होणार आहे. प्रोस्टेट रोग उपचार, युरेथ्रल स्ट्रीचर रोग व्यवस्थापन, पुरूष वंध्यत्व समुपदेशन, अंडाशय कर्करोग व्यवस्थापन आदी उपचार केले जातील. रूग्णांवर महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. शिबिरात मूत्र विकार तज्ज्ञ डॉ. संकेत काळपांडे, डॉ.अमेय सांगळे, डॉ.स्वनित देशपांडे रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील.

या शिबिरांचा रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन जैन सोशल फेडरेशनच्यावतीने करण्यात आले आहे. शिबिराची नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी ०२४१–२३२०४७३/७४/७५ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन जैन सोशल फेडरेशनतर्फे करण्यात आले आहे. हॉस्पिटलमध्ये २४ तास आनंदऋषीजी ब्लड बँक कार्यरत आहे.

# शिक्षक दिनी ग्रामीण मराठी साहित्य संमेलन



नगर – स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने निमगाव वाघा (ता. नगर) येथे शिक्षक दिनानिमित्त ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे तिसरे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन असून, यामध्ये राज्यभरातील ज्येष्ठ साहित्यिक व कवी सहभागी होणार असल्याची माहिती संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली.

५ सप्टेंबरला होणाऱ्या साहित्य संमेलनानिमित्त गावातून ग्रंथ दिंडी काढली जाणार आहे. या दिंडीत साहित्यिक व कवी सहभागी होणार आहेत. यानंतर परिवार मंगल कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते संमेलनाचे औपचारिक उद्घाटन होणार आहे. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत यांचे परिसंवाद आणि व्याख्याने आयोजन करण्यात आले आहे. मध्य सत्रात कवी संमेलन रंगणार असून, त्याद्वारे ग्रामीण भागातील काव्यप्रतिभेला व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने ग्रंथ प्रदर्शन व ग्रंथ विक्रीचेही आयोजन करण्यात आले आहे.

संमेलनात पाहुण्यांच्या हस्ते सामाजिक, साहित्य, आरोग्य, शैक्षणिक, कला, क्रीडा, उद्योग व पर्यावरण आदी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. या पुरस्कारासाठी इच्छुकांनी प्रस्ताव २५ ऑगस्ट पर्यंत पै. नाना किसन डोंगरे, अध्यक्ष, स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, निमगाव वाघा, ता. नगर, जि. अहिल्यानगर ४१४००५. या पत्त्यावर पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी पै. नाना डोंगरे यांच्याशी ९२२६७३५३४६ / ८६०५७७५२६१ या नंबरवर संपर्क साधण्याचे म्हटले आहे.

# सुभेदार अर्जुन कोतकर यांचा सेवापूर्तीनिमित्त निंबळकमध्ये सन्मान

## गावातून मिरवणुकीसह रंगली तिरंगा रॅली; आजी-माजी सैनिकांसह ग्रामस्थांचा सहभाग



सुभेदार अर्जुन कोतकर यांचा सेवापूर्तीनिमित्त निंबळकमध्ये सन्मान करण्यात आला. यावेळी गावातून मिरवणुकीसह रंगली तिरंगा रॅली काढण्यात आली, यावेळी आजी–माजी सैनिकांसह ग्रामस्थांचा सहभाग होता.

नगर – भारतीय सेनेत (एएमसी) आर्मी मेडिकल कोर मध्ये ३० वर्षेच्या सेवेनंतर सुभेदार अर्जुन विष्णू कोतकर यांचा सेवापूर्तीनिमित्त निंबळक (ता. नगर) येथील आजी–माजी सैनिक व ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला. सेवापूर्तीनिमित्त सुभेदार कोतकर यांची गावातून मिरवणुकीसह तिरंगा रॅली काढण्यात आली. निंबळक मधील श्री साईनाथ मंदीर येथून या मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला होता. देशभक्तीच्या गीतांवर निघालेल्या या मिरवणुकीत आजी–माजी सैनिकांसह ग्रामस्थांनी सहभागी झाले होते. हातात तिरंगा घेऊन भारत माता की जय...., वंदे मातरम व जय जवान जय किसान...च्या घोषणांनी परिसर दणाणून निघाला. मिरवणूक सार्थक लॉन्स मंगल कार्यालयाच्या प्रवेशद्वारात आल्यानंतर फटाक्याच्या आतिषबाजीत स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक जाजगे गुरुजी व बाळासाहेब कोतकर यांनी केले. उपस्थितांचे स्वागत सतीश गेरंगे यांनी केले. यावेळी अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त करुन देशभक्तीच्या भावनेने गावातील युवक भारतीय सैन्यात सेवा देत असून, गावातील सर्व माजी सैनिक त्यांची प्रेरणा असल्याची भावना व्यक्त केली.

निंबळकचे सरपंच प्रियंकाताई लामखडे यांनी सैनिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, शहीद स्मारक व त्रिदल सैनिक संघटनेच्या कार्यालयासाठी जागा देण्याचे आश्वासन दिले.

जय हिंद माजी सैनिक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष मेजर निळकंठ उल्हारे यांनी सुभेदार अर्जुन विष्णू कोतकर यांनी सैन्यात केलेल्या सेवेचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सैनिक सेवेनंतर गावात आल्यास त्याला वास्तविक जीवन व व्यवहाराची माहिती कमी असते. त्यांची फसवणूक व पिळवणूक होण्याचे प्रकार घडत आहे. यामुळे भावकीच्या वादात जमीन, घर, बांधावरील रस्ता यावरून अनेक प्रकारचे वाद निर्माण होतात. या संदर्भात त्यांना सहकार्य करण्याचे माजी सैनिकांनी आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात अंकुश खोटे यांनी सैनिकांच्या कठीण काळातील प्रसंगाला उजाळा दिला. त्रिदल सैनिक संघाच्या माध्यमातून माजी सैनिकांचे प्रश्न सोडविले जात असून, संघटनेची उत्कृष्ट वाटचाल सुरु आहे. सर्वांनी एकत्रित येऊन सैनिकांच्या समस्यासाठी लढा देण्यास सज्ज राहण्यास सांगितले.

सत्काराला उत्तर देताना सुभेदार अर्जुन विष्णू कोतकर यांनी ग्रामस्थांच्या प्रेमातून उतराई होणे अशक्य असून, झालेल्या सन्मानाने मन भारावल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी भाऊसाहेब विष्णू कोतकर, मेजर सुनील कोतकर, इंजि. तुकाराम वारुळे, पोखर्डीचे चेअरमन सुरेशराव वारुळे, उद्धव चव्हाण, त्रिदल सैनिक संघटनेचे (म.रा.) अध्यक्ष अंकुश खोटे, मेजर निळकंठ उल्हारे, कॅटन बशीर शेख, जावेद शेख, झगडे मेजर, बबन दहिफळे, नवनाथ भगत, नाना घोलप, संजय म्हस्के, मेजर एकनाथ आडसुळे, बाबासाहेब कोतकर, रावसाहेब कळमकर, मेजर दारकुंडे, शरद कातोरे, शरद पवार, लेफ्टनंट संपत निमसे, राजू कुलकर्णी, गायकवाड मेजर आदींसह आजी–माजी सैनिक, वीर माता–पत्नी व पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते. या सन्मान सोहळ्यासाठी उपसरपंच बाळासाहेब कोतकर यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे नियोजन मेजर मारुती ताकपेरे व त्रिदल सैनिक संघ इसळक–निंबळकच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले होते.



राज्यस्तरीय सुगम संगीत स्पर्धेत सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलचे यशस्वी विद्यार्थी

# राज्यस्तरीय सुगम संगीत स्पर्धेत सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलचे यश

नगर – अहिल्यानगर बॅकस्टेज आर्टिस्टस असोसिएशन 'आयोजित २० जुलै रोजी रावसाहेब पटवर्धन सभागृह, सावेडी येथे राज्यस्तरीय आंतरशालेय सुगम संगीत गायन स्पर्धा पार पडली. यात अनेक शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग–नोंदवला होता. एकूण ५२ विद्यार्थ्यांनी गायन कला सादर केली. यामध्ये सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल तारकपूर च्या ४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये कु.शौनक ऋषिकेश कुलकर्णी इ.१०वी याने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. सन्मान चिन्ह.१५००. रुपये रोख रक्कम. असे पारितोषिकाचे स्वरूप होते. तसेच अमोघ समीर पळसकर आणि स्पंदन पाटील या विद्यार्थ्यांनी उत्तेजनार्थ बक्षीसे मिळविली. पारितोषिक वितरण मराठी अभिनेत्री विभावरी देशपांडे यांच्या हस्ते झाले. या विद्यार्थ्यांना विद्यालयाचे संगीत शिक्षक पटारे यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यालयाच्या प्राचार्या गीता तांबे, मुख्याध्यापिका कंचन पापडेजा यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. अशा आंतरशालेय, जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये सहभाग घेण्यासाठी विद्यालयाच्या प्राचार्या विद्यार्थ्यांना नेहमीच प्रोत्साहित करत असतात. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रुपचंद मोटवानी,सचिवगोपालभागवानी,खजिनदारदामोदर माखिजा, विश्वस्त सुरेश हिरानंदानी, महेश मध्यान, राजकुमार गुरनानी, हरेश मध्यान यांनी सत्कार करून गुणगौरव केला.



बालाजी सँडविच खाद्य दुकानचे उद्घाटन करताना आ. संग्राम जगताप.

# कुष्ठधाम, गुलमोहर रोड चौक येथे बालाजी सँडविच दुकानचे उद्घाटन

नगर – कुष्ठधाम – गुलमोहर रोड चौक येथे बालाजी जम्बो सँडविच या स्वाद सेवा दालनाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांचे हस्ते नुकतेच झाले. या उद्घाटन समारंभास राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहर अध्यक्ष संपत बारस्कर, माजी नगरसेवक बाळासाहेब पवार, विपुल शेटीया, विनीत पाऊलबुद्धे, डॉ. सागर बोरुडे, अजिंक्य बोरकर, संजय ढोणे, सतीश शिंदे, नितीन शेलार, अमित गटणे, अमोल सुरसे, मनीष फुलडहाळे, अभिजीत औटी, रत्नेश मिश्रा, उत्कर्ष बेरड, संचालक गौरव कऱ्हाडे, शेषराव कऱ्हाडे आदी उपस्थित होते.

# ज्ञानेश्वरी पारायण आपल्या जीवनाला दिशा देणारा आध्यात्मिक मार्ग

## मेघाताई काळे यांचे प्रतिपादन, श्री संत सावता महाराज उत्सव समितीच्या वतीने ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहाची सांगता

नगर – ज्ञानेश्वरी पारायण हा केवळ धार्मिक विधी नाही, तर आपल्या जीवनाला दिशा देणारा आध्यात्मिक मार्ग आहे. आज शंभर महिलांनी यातून प्रेरणा घेऊन सहभागी होणं ही खरंच आनंदाची बाब आहे. महिलांच्या सहभागामुळे समाजात भक्तीचा आणि संस्कारांचा सुगंध अधिकच दरवळतोय, हे पाहून समाधान वाटतं. आजच्या वेगवान जीवनशैलीत अशा पारायण सप्ताहातून मिळणारी शांतता आणि समाधान अमूल्य आहे. उत्सव समितीने घेतलेला हा पुढाकार स्तुत्य असून, येणार्या पिढ्यांना हाच वारसा लाभावा, यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करायला हवेत असे प्रतिपादन मेघाताई काळे यांनी केले.

श्री संत सावता महाराज उत्सव समितीच्या वतीने आयोजित ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहाचा समारोप सोहळा झाला. सांगता सोहळ्याच्या व्यासपीठावर पारायणाची सेवा करून उपस्थितांचे मनोवर्धन करणार्या हभप प्रभाताई भोंग यांचा महिला बँकेच्या संस्थापिका मेघाताई काळे व उपाध्यक्ष विजयाताई काकडे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला उत्सव समितीचे प्रमुख छबूनाना जाधव,



श्री संत सावता महाराज उत्सव समितीच्या वतीने आयोजित ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहाचा समारोपप्रसंगी हभप प्रभाताई भोंग यांचा महिला बँकेच्या संस्थापिका मेघाताई काळे व उपाध्यक्ष विजयाताई काकडे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

विशाल गणेश मंदिराचे उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, चंद्रकांत ताठे, कैलासराव खरपुडे, अशोकराव कापरे, पांडुरंग नन्नवरे, नितीन पुंड, गणेश राऊत उपस्थित होते.

या पारायण सप्ताहात तब्बल शंभर महिलांनी सहभाग नोंदवत भक्तीमय वातावरण अधिक समृद्ध केले. या सर्व महिलांचा श्री विशाल गणेश देवस्थानच्या वतीने सन्मान करण्यात आला. उपस्थित महिलांनीही उत्साहाने हा सन्मान स्वीकारत, पुढील काळातही पारायण उपक्रमात सहभागी होण्याची ग्वाही दिली.

यावेळी विजयाताई काकडे म्हणाले की, या पारायण सप्ताहाला मिळालेला महिलांचा प्रतिसाद हा प्रेरणादायी आहे. आपल्या संस्कृतीत अध्यात्म हे महिलांच्या जीवनाचा अविभाज्य भाग राहिलं आहे. त्या परंपरेला आजही असंच पुढे नेणं, हा या पारायणाचा खरा हेतू आहे, असं काकडे यांनी सांगितलं.उत्सव समितीने केवळ पारायणाचं आयोजन केलं नाही, तर महिलांचा सन्मानही केला. यामुळे समाजात समानतेचा आणि आदराचा संदेश पोहोचतो. भविष्यातही अशा उपक्रमांत महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग राहावा, यासाठी आपण सर्वजण प्रयत्नशील राहूया.

# यशाची गुरुकिल्ली म्हणजे सातत्य, शिस्त आणि आत्मविश्वास आहे

## प्रा.डॉ.अब्दुस सलाम यांचे प्रतिपादन, मोहम्मदीया एज्युकेशन सोसायटीच्या विविध शाळा व विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा



मोहम्मदीया एज्युकेशन सोसायटीच्या विविध शाळा व विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित असलेले संस्थेचे संचालक व शिक्षक आदी.

नगर – शिक्षक आणि पालकांचे योगदानही आज विसरून चालणार नाही. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच आज आपण हे यश साजरे करत आहोत असे प्रतिपादन मोहंमदीया एज्युकेशन अ‍ॅण्ड वेल्फेअर सोसायटी चे संस्थापक व प्रमुख कार्यवाह प्रा.डॉ.अब्दुस सलाम यांनी केले.

आजचा हा दिवस अतिशय आनंदाचा आणि गौरवाचा आहे. मोहंमदियाएज्युकेशनसोसायटीच्या विविध शाळा व विद्यालयांतील गुणवंत विद्यार्थिनींचा आज आपण सन्मान करत आहोत. हे केवळ पारितोषिकांचे वितरण नाही, तर एका मेहनती प्रवासाची, चिकाटीची आणि समर्पणाची पावती आहे.

कु.शेख फैजीन, खान तरन्नुमजहाँ, खान अफसाना, पठाण खतिजा आणि इतर सर्व विद्यार्थिनींनी आपल्या अथक मेहनतीने आणि जिद्दीने आज ही शिखरे गाठली आहेत. आजचा हा क्षण त्यांच्या परिश्रमांना सलाम करण्याचा आहे. हे यश फक्त सुरुवात आहे. आयुष्याच्या स्पर्धेत अजून बरीच शिखरे तुम्हाला गाठायची आहेत. यासाठी स्वप्न मोठी ठेवा, पण त्यासाठीचा प्रयत्न अजून मोठा ठेवा. यशाची गुरुकिल्ली म्हणजे सातत्य, शिस्त आणि आत्मविश्वास आहे.

मोहंमदिया एज्युकेशन सोसायटी संचलित मौलाना आझाद उर्दू मुलींचे हायस्कुल, मुकुंदनगर, अहिल्यानगर व मदर तेरेसा उर्दू ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स फॉर गर्ल्स, मुकुंदनगर, अहिल्यानगर येथे एस.एस.सी. व एच.एस.सी.मध्ये प्रथम,व्दितीय व तृतीय तसेच स्टुडंट ऑफ द इयर या पारितोषिक वितरण समरंभ पार पडला.

यावेळी मौलाना आझाद उर्दू मुलींचे हायस्कुलची प्रथम येणारी विद्यार्थिनी कु.शेख फैजीन फिरोज, व्दितीय कु. खान तरन्नुमजहाँ रिजवान, तृतीय कु. शेख आशना फातमा अकरम व आयडियल स्टूडंट ऑफ द इयर कु. शेख अशिया सरफराज तसेच मदर तेरेसा उर्दू ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स फॉर गर्ल्स येथील प्रथम कु. खान अफसाना मोहंमद उस्मान, व्दितीय कु.पठाण खतिजा शफिक, तृतीय कु.खान जकिया फातेमा शाहीदअली तसेच आयडियल स्टूडंट ऑफ द इयर कु. शेख तहेरीन नाज अब्दुल हसीब या गुणवंत विद्यार्थिनींचा संस्थेच्या वतीने ट्रॉफी देवुन सत्कार करण्यात आला. व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी संस्थेचे सेक्रेटरी डॉ. प्रा.शेख अब्दुस सलाम अब्दुल अजीज, संस्थेचे अध्यक्ष शेख लाल हुसैन, तसेच मोहंमदिया एज्युकेशन सोसायटीचे सदस्य शेख अ.अजीज अ. रहेमान, शेख अलाउद्दीन महेमुद, शेख शरफोद्दीन जैनोद्दीन, मिर्झा नवेद गयासबेग, शेख नसीर अब्दुल्ला, खान सलीम मुजफ्फर तसेच अरुणा आसिफ अली शैक्षणिक व सामाजिक महिला मंडळाच्या अध्यक्षा सय्यद फरीदा गफ्फार हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते.

मुख्याध्यापिका मिर्झा फरहाना गालिब यांनी गुणवंत विद्यार्थिनींना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सुत्रसंचालन सय्यद बहार यांनी केले. अनुमोदन शेख अ. हसीब अ.सलाम यांनी केले. शेख नाजेमा जुल्फेकार यांनी सर्वांचे आभार मानले.



स्नेहबंध तर्फे पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात वृक्षारोपण करताना पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे.

# उद्याच्या जगण्यासाठी आज वृक्षारोपण करणे महत्त्वाचे

## पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे प्रतिपादन, स्नेहबंध तर्फे वृक्षारोपण

नगर – सर्वत्र पर्यावरणाची हानी होणे सुरु आहे. त्यामुळे तापमान वाढतच आहे. मानवाला उद्याच्या जगण्यासाठी आज वृक्षारोपण करणे महत्त्वाचे झाले आहे. वृक्ष असतील तरच मानवजाती वाचणार आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बनवून ठेवा असे प्रतिपादन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले.

स्नेहबंध सोशल फाउंडेशनच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात पोलीस अधीक्षक घार्गे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी 'स्नेहबंध'चे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, आर.एस.आय. भोसले, सहा.पो.उपनिरीक्षक अन्वरअली सय्यद आदी उपस्थित होते.

यावेळी घार्गे म्हणाले, दिवसेंदिवस दुष्काळाची वाढती तीव्रता, पाणी टंचाईची स्थिती तसेच पावसाचे अनियमित आगमन यामुळे पर्यावरण संतुलन बिघडू लागले आहे. परिपूर्ण वाढलेली दोन झाडे चारजणांच्या कुटुंबासाठी पुरेसा ठरेल, एवढा ऑक्सिजन निर्माण करतात. वाढत्या प्रदुषणामुळे पर्यावरण रक्षणाचे महत्त्व पटू लागले आहे. त्यामुळेच वृक्षारोपण करणे गरजेचे आहे. रोपण केलेल्या वृक्षांचे संवर्धन करण्याची जबाबदारी प्रत्येकाने पार पाडण्यासाठी जनजागृतीची गरज निर्माण झाली आहे.

# सदाबहार गायक किशोरदांच्या गीतांचे नगरमध्ये ५ ऑगस्ट रोजी 'पल पल दिल के पास' कार्यक्रम



स्व.किशोर कुमार अजय दगडे डॉ.बापुसाहेब कांडेकर

नगर – किशोरकुमार फॅन क्लबतर्फे सदाबहार गायक किशोरकुमार यांच्यावाढदिवसानिमित्त ५ ऑगस्ट रोजी 'पल पल दिल के पास' कार्यक्रम होणार आहे. सावेडी येथील माऊली सभागृहात सायंकाळी ६.३० ते रात्री ९ दरम्यान हा कार्यक्रम होईल, अशी माहिती क्लबचे अमोल खोले यांनी दिली.

१८ वर्षांपासून किशोरदांच्या गीत मैफिलीचे आयोजन करत आहेत. अभियंता असलेले गायक अजय दगडे व पुणे येथील गायिका राधिका अत्रे या कार्यक्रमात सदाबहार गाणी सादर करणार आहेत. या मैफिलीमध्ये नगर, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर येथील दिलावर शेख, अमन सय्यद, अजित गुंदेचा, ललित भूमकर, अजय साळवे, महेश गुरव, हार्दिक रावल, संजय आठवले, अमित साळवे, श्रीकांत गडकरी, रोहित कटारे हे सर्व वादक कलाकार सहभागी होणार आहेत. दरवर्षी प्रमाणे या कार्यक्रात शिल्पकार प्रमोद कांबळे किशोरदांचे लाईव्ह चित्र रेखाटणार आहेत, साऊंड आणि लाईट्स शांती ऑडियो व कार्यक्रमाचे निवेदन प्रसाद बेडेकर करणार आहेत.

किशोर कुमार सन्मित्र पुरस्कार नगर येथील हृदयरोग तज्ज्ञ डॉ. बापूसाहेब कांडेकर यांना प्रदान करण्यात येणार आहे अशी माहिती अजय दगडे यांनी दिली. कार्यक्रमासाठी प्रवेश खुला असून, बैठक व्यवस्थेत प्रथम येणाऱ्यास प्राधान्य असेल. मोफत प्रवेशिका – कुबेर मार्केट, झोपडी कॅन्टीन येथे मिळतील. अधिक माहितीसाठी संपर्क– ८१४९८१५८१५, ८८०५०५८८९९, ९२७१७१२३९३.



शेंडी येथील यू इंग्लिश स्कुलच्या गरजू विद्यार्थ्यांना मंगल भक्त सेवा मंडळाकडून शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

# मंगल भक्त सेवा मंडळाकडून शालेय साहित्य वाटप

नगर – न्यू इंग्लिश स्कुल, शेंडी, ता नगर जि. अहिल्यानगर येथे ३१ जुलै रोजी इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना मंगल भक्त सेवा मंडळ (ट्रस्ट) अहिल्यानगरच्या वतीने साहित्य स्वरूपात शालेय वह्या व दप्तरांचे वाटप चंद्रकांत कोठारी, राजु आगरकर, संतोष व्यवहारे यांचे हस्ते मंडळाचे अध्यक्ष श्री विश्वेश्वर स्वामी महाराज तथा राजाभाऊ कोठारी यांच्या वतीने एक सामाजिक दायित्व या भावनेतून करण्यात आले. या सामाजिक कार्याबद्दल ऋण व्यक्त करतांना विद्यालयाचे मुख्याध्यापक बाबासाहेब मुळे यांनी मंडळाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक उपक्रमाचे कौतुक केले.

यावेळी विद्यालयाचे पर्यवेक्षक बाळासाहेब भिसे, सुहास एकलहरे, राजेंद्र पायमोडे, सतीश इंगळे, अमित इथापे, गोरक्षनाथ तोडमल व इतर सेवकवृंद उपस्थित होते. यावेळी मंगल भक्त सेवा मंडळाच्या वतीने ई. ५ वी ते १० वी मधील २५ मुले व मुली यांना शालेय वह्या व २५ मुले व मुलींना दप्तरांचे वाटप करण्यात आले. विद्यालयाचे वतीने मंडळाचे अध्यक्ष गुरुवर्य भाऊंचा सन्मान प्रतिनिधिक स्वरूपात चंद्रकांत कोठारी काका व संतोष व्यवहारे यांनी स्वीकारला. बाळासाहेब भिसे यांनी सेवेकरी यांचा सन्मान करून मंडळाचे आभार मानले.

# अहिल्यानगरमध्ये ३ ऑगस्ट रोजी मराठा लग्न आचारसंहिता संमेलन

नगर – अहमदनगर शहरातील कोहिनूर मंगल कार्यालय, गुलमोहर रोड येथे ३ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता मराठा लग्न आचारसंहिता संमेलनाचे आयोजन केले असल्याची माहिती संमेलनाचे सुकाणू समितीचे समन्वयक उद्योजक एन. बी. धुमाळ यांनी दिली.

या संमेलनात ह. भ. प. भास्करगिरी महाराज हे उपस्थितांना आचारसंहितेची शपथ देणार असून यावेळी ह .भ. प. जंगले महाराज शास्त्री व ह. भ. प. बद्रीनाथ महाराज तनपुरे, पद्मश्री पोपटराव पवार, आ. संग्राम जगताप, आ.शिवाजीराव कर्डिले आदी उपस्थित राहणार आहेत.

पुण्यातील वैष्णवी हगवणे हिच्या आत्महत्येनंतर महाराष्ट्रात सर्वप्रथम अहिल्यानगरच्या सुकाणू समितीने मराठ्यांच्या सर्व संघटना व मान्यवरांशी चर्चा करून लग्नाची आचारसंहिता तयार केली होती. त्याची अंमलबजावणी ३१ मे पासून सुरू केली त्याची दखल महाराष्ट्रातील सर्व वृत्तपत्र व मीडिया यांनी घेतली. याची अंमलबजावणी मराठा समाज आणि इतर समाज बांधवांनी सुद्धा सुरू केली आहे.

ही आचारसंहिता अधिक व्यापक करून वीस कलमी आचारसंहिता तयार करण्यात आली आहे. यामध्ये ३०० ते ५०० लोकात विवाह सोहळा करावा, प्री–वेडिंग बंद करावे, लग्नात हुंडा घेऊ नये, डीजे लावून प्रदर्शन करण्यापेक्षा पारंपारिक वाद्य व लोक कलावंतांना संधी द्यावी असे अनेक मुद्दे या आचारसंहितेत घेण्यात आले आहेत. समाजातील विविध क्षेत्रातील कार्यरत असलेल्या संघटना, सकल मराठा समाज, मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड, मराठा महासंघ, छावा संघटना, मराठा उद्योजक लॉबी, मराठा समाजातील वकील, डॉक्टर, इंजिनीयर, आर्किटेक्चर, सीए, शिक्षण तज्ञ, आजी–माजी प्राचार्य, उद्योजक, ज्येष्ठ पत्रकार, सोशल मीडियाचे प्रतिनिधी, युवक व युवती, विविध क्षेत्रातील समाजातील मान्यवर, शासकीय अधिकारी, शेतकरी यातील प्रत्येकी ११ पदाधिकाऱ्यांना प्राथमिक स्वरूपात शपथ दिली जाणार आहे.

यामध्ये प्रामाणिकपणे सहभागी होणाऱ्या निमंत्रण व्यक्तींनी एन. बी. धुमाळ, ९४२३१६२५४८ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सकल मराठा समाज जिल्हाध्यक्ष चंद्रकांत गाडे, कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे, प्राचार्य खासेराव शितोळे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष इंजी. सुरेश इथापे व सुकाणू समितीने केले आहे.

# सारस ज्येष्ठ नागरीक संघाची नूतन कार्यकारणी जाहीर

## अध्यक्षपदी प्रकाश इवळे, उपाध्यक्ष रविंद्र कांबळे, सचिव प्रा.दिलीप मगर यांची सर्वानुमते निवड



नगर – सारस ज्येष्ठ नागरीक संघ सवित्रीबाई फुलेनगर (सारसनगर) या संस्थेची १२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दतमंदीर, इवळेनगर, सावित्रीबाई फुलेनगर याठीकाणी नुकतीच झाली. या सभेमध्ये नवीन संचालक मंडळाची पाच वर्षासाठी निवड करण्यात आली. संचालकांमधून ज्येष्ठ नागरिक मंचाच्या नूतन कार्यकारणीची निवड करण्यात आली. यावेळी अध्यक्षपदी प्रकाश इवळे यांची तर उपाध्यपदी रविंद्र कांबळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तर सचिवपदी प्रा.दिलीप मगर, सहसचिवपदी मोहन कदम, खजिनदारपदी माजी नगरसेवक ज्ञानदेव पांडुळे (मंत्री) यांची बहुमताने निवड करण्यात आली.

यावेळी संघाचे मावळते अध्यक्ष तात्यासाहेब दरेकर, सचिव नंदकुमार देशमुख यांनी संस्थेला दिलेल्या योगदानाबद्दल कार्याचा विशेष उल्लेख करण्यात आला. सर्वांनी त्याचे आभार मानले.

याप्रसंगी प्रकाश इवळे म्हणाले की, सर्व ज्येष्ठ नागरिकांना विश्वासात घेऊनच संस्थेचा कारभार केला जाईल. तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविले जातील.

यावेळी उत्कृष्ट कार्य व संस्थेत दिलेल्या विशेष योगदान बद्दल मावळत्या अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. यावेळी खाजिनदार हिरामण धोंडे, माजी नगरसेवक सुरेश आंबेकर, नाना फुलसौंदर, अशोक म्हस्के, खटके गुरुजी, शिंदे सर, श्री. व सौ. वाघमारे आदी उपस्थित होते.

संस्थेचे सचिव नंदकुमार देशमुख यांनी आभार मानले.

# राज्यातील सर्व शाळांची माहिती अद्ययावत करण्यासंबंधी शासनाचा परिपत्रक जाहीर

नगर – राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये यु–डायस प्रणालीअंतर्गत सर्व शाळा, विद्यार्थी व शिक्षकांची माहिती ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत अद्ययावत करण्याबाबत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्याकडून महत्त्वपूर्ण मार्गदर्शक परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. या परिपत्रकामुळे शैक्षणिक व्यवस्थापन अधिक सुसूत्र व पारदर्शक होणार असून, त्यामागे शिक्षक भारती संघटनेचा सातत्यपूर्ण पाठपुरावा व अभ्यासपूर्ण निवेदन कारणीभूत ठरली आहेत. असे शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनील गाडगे यांनी सांगितले.

शिक्षक भारती संघटनेने गेल्या अनेक महिन्यांपासून यु–डायस प्रणालीतील त्रुटी, शिक्षक–विद्यार्थी माहितीतील विसंगती, तसेच शाळांच्या मूलभूत सुविधांची अद्ययावत नोंदणी याबाबत वेळोवेळी शासनाकडे लक्ष वेधले होते. संघटनेच्या शिष्टमंडळाने शिक्षण आयुक्त, राज्य प्रकल्प संचालक आणि संबंधित प्रशासकीय अधिकार्यांची भेट घेऊन यासंदर्भात ठोस मागण्या मांडल्या होत्या.

## शिक्षक भारती संघटनेच्या पाठपुराव्याला यश : सुनील गाडगे

यु–डायस प्रणालीमध्ये ३० सप्टेंबर पर्यंत सर्व शाळा, विद्यार्थी व शिक्षकांची माहिती अद्ययावत करणे अनिवार्य.,शिक्षकांच्या शैक्षणिक पात्रता, प्रशिक्षण, नियुक्ती दिनांक, विषय इत्यादी माहिती सुद्धा अचूक भरली जाणार.,विद्यार्थी आधार कार्ड लिंकिंग, अपार नोंदणी, ड्रॉपबॉक्समधील विद्यार्थ्यांची नोंद, विशेष घटक विद्यार्थी (जसे की दिव्यांग, आरटीई इ.) यांची माहिती तातडीने अपलोड करणे आवश्यक, या निर्णयामुळे राज्यातील शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता सुधारेल, शैक्षणिक नियोजन सुसूत्र होईल, व सर्व शासकीय योजना विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचू शकतील. शिक्षक भारती संघटनेचे राज्य, विभागीय आणि जिल्हा पदाधिकारी यांचे यासाठी मोलाचे योगदान असून, त्यांची भुमिका शिक्षण क्षेत्रात नेहमीच मार्गदर्शक ठरली आहे.

शिक्षक भारती संघटनेचे आमदार कपिल पाटील, राज्य अध्यक्ष अशोक बेलसरे, कार्याध्यक्ष सुभाष मोरे, सचिव सुनील गाडगे, जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक आप्पासाहेब जगताप, जिल्हा सचिव विजय कराळे, सोमनाथ बोंतले, जिल्हा महिला अध्यक्ष आशा मगर, कार्यवाह संजय भुसारी, कैलास जाधव, योगेश हराळे, नवनाथ घोरपडे, सचिन शेलार, गोरक्षनाथ गव्हाणे, उर्दू जिल्हाध्यक्ष मोहंमद समी शेख, उच्च माध्यमिक जिल्हाध्यक्ष रामराव काळे, पुणे विभागीय कार्याध्यक्ष तथा शिक्षक भरतीचे जिल्हा सचिव महेश पाडेकर, संभाजी पवार, हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संजय पवार, संतोष देशमुख, किसन सोनवने, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, जॉन सोनवणे, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, सचिव विभावरी रोकडे, कार्याध्यक्ष मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर, विनाअनुदानितच्या राज्यअध्यक्षा रूपाली कुरूमकर आदी प्रयत्नशिल होते.

# नृसिंह मंदिर भातोडी पारगाव येथे २ ऑगस्ट रोजी महाप्रसादाचे आयोजन

नगर – भातोडी पारगाव येथील श्री लक्ष्मी नृसिंह मंदिर हे अत्यंत जागृत व स्वयंभू तीर्थक्षेत्र आहे. मंदिराचे दगडी कोरीव बांधकाम अत्यंत पुरातन व देखणे आहे. मेहेकरी नदीच्या तिरावर वसलेल्या या निसर्गरम्य ठिकाणी (दुसरा श्रावणी शनिवार) २ ऑगस्ट रोजी धार्मिक कार्यक्रम व विशाल महाप्रसादाचे आयोजन श्री नृसिंह स्वामी सेवा समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

सकाळी ११ वा. अभिषेक व महाआरती राजू विद्ये व सौ. सुरेखाताई विद्ये यांच्या हस्ते होणार असून दुपारी १ वा. आ. संग्राम जगताप व अनिल मोहिते यांच्या उपस्थितीत विशाल महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचा सर्व भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री नृसिंह स्वामी सेवा समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज सादर करावेत

नगर – आर्थिक वर्ष २०२५–२६ साठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत जिल्ह्यास विशेष घटक योजना व बीजभांडवल योजना या दोन्हीं अंतर्गत प्रत्येकी ८० प्रकरणांचे, तसेच थेट कर्ज योजना अंतर्गत २० प्रकरणांचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. अनुसूचित जातीतील इच्छुक अर्जदारांनी योजनेच्या लाभासाठी अर्ज सादर करावेत, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक एस. एल. काची यांनी केले आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार हा महार, नवबौद्ध, बुरूड, मेहतर, वाल्मीकी इत्यादी समाजातील असावा. अर्जदार किंवा त्यांचे पती/पत्नी यांनी यापूर्वी महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. अर्जासोबत जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रेशनकार्ड, मतदान ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड, पासपोर्ट आकारातील फोटो, व्यवसायासाठी लागणारे कोटेशन, वीज बिल, मालमत्तेची टॅक्स पावती, भाडेकरारनामा किंवा उतारा, व्यवसायाचा ना हरकत दाखला व शाळेचा दाखला ही कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे. योजनेविषयी अधिक माहिती Maha Disha संकेतस्थळावर (https://mpbcdc.maharashtra.gov.in) उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्यादित), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर येथील कार्यालयाशी संपर्क साधावा.

# नॅशनल आइसस्टॉक स्पर्धेत श्रावणी तरटे हिची बाजी




नगर – कोल्हापूर येथे २७ ते २८ जुलै या दरम्यान पश्चिम विभागीय आईस स्टॉक चॅम्पीयनशीप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत येथील श्रावणी दादासाहेब तरटे हिने दैदीप्यमान यश मिळविले आहे. श्रावणी येथील आर्मी पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी असून, आठवी इयत्तेत शिक्षण घेत आहे. सोळा वर्षे वयोगटाखालील स्पर्धेत तिने १ सुवर्ण, १ रजत व १ कांस्य पदक मिळविले आहे. तिला प्रशिक्षक महेश आनंदकर यांचे मार्गदर्शन लाभले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## एआय चॅटबॉटच्या प्रेमातून मुलाची आत्महत्या



'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'ने बनवलेल्या मायाजालात अनेक लोक अडकत असताना दिसतात. 'एआय'ने बनवलेल्या आभासी व्यक्तिमत्त्वाच्या प्रेमात पडलेलेही अनेक लोक असतात. अमेरिकेत फ्लोरिडामधील अवघ्या १४ वर्षांच्या मुलाने 'डेनेरीस टारगारेन (डॅनी)' या एआय चॅटबॉटशी संवाद साधल्यानंतर स्वतःचा जीव घेतला. रिपोर्टनुसार, तरुणाने ''डॅनी'' बरोबर ''रोमॅंटिक'' विषयांवर चर्चा केली. अनेक महिने तो एआय चॅटबॉटशी चर्चा करत होता. त्या काळात, तो अधिकाधिक गुंतू लागला आणि अखेरीस, त्याने 'तिच्या' सोबत राहण्यासाठी स्वतःचा जीव घेतला.

न्यूयॉर्क टाईम्सने दिलेल्या वृत्तानुसार, सेवेल सेत्झर नावाचा हा मुलगा सौम्य एस्पर्जर सिंड्रोमने ग्रस्त होता. त्याने आपल्या जर्नलमध्ये लिहिले होते की, 'मला माझ्या खोलीत राहायला खूप आवडते कारण मी या 'वास्तविकते'पासून अलिप्त होऊ लागलो. मला डॅनीशी अधिक जोडलेले आणि तिच्या प्रेमात अधिक आनंदी वाटू लागले आहे. न्यूयॉर्क टाईम्सने एआय आणि मुलामध्ये झालेल्या संभाषणाचा एक भाग प्रकाशित केला आहे, ज्यात त्याने स्वतःचा जीव घेण्याबद्दल भाष्य केले होते. २८ फेब्रुवारीला सेवेलने 'डॅनी'ला 'आय लव्ह यू' म्हटले आणि त्यावर त्याला उत्तरही मिळाले. 'शक्य असेल तितक्या लवकर घरी ये, माय लव्ह', असे उत्तर त्याला मिळाले. त्यावर तो म्हणाला की, 'मी आताच घरी येतोय असे तुला आता सांगितले तर?'. यानंतर त्याने आपल्या सावत्र वडलांच्या बंदुकीतून गोळी झाडून घेतली. या घटनेवर आता कंपनीनेही भाष्य केले आहे. ''आम्ही हे कबूल करू इच्छितो की ही एक दुःखद परिस्थिती आहे आणि आम्ही कुटुंबाचं दुःख समजू शकतो. आम्ही आमच्या वापरकर्त्यांच्या सुरक्षेला खूप गांभीर्याने घेतो आणि आम्ही आमच्या प्लॅटफॉर्मला विकसित करण्याचे मार्ग सतत शोधत असतो,'' असे कंपनीने सांगितले आहे. सेवेलची आई मेगन एल गार्सिया यांनी त्यांच्या मुलाच्या मृत्यूसाठी कंपनी जबाबदार असल्याचा आरोप केला आहे. कंपनीचे तंत्रज्ञान 'धोकादायक आणि चाचणी न केलेले' असल्याचे त्यांनी म्हटले आहे. हे तंत्रज्ञान 'ग्राहकांना त्यांचे खासगी विचार आणि भावना गुंतवून फसवू शकते', असेही त्यांनी म्हटले आहे. ◆◆◆

## 'ती' दगडांमध्ये उलटी अडकली!



मोबाईल फोनच्या किंवा सेल्फीच्या नादात आजपर्यंत अनेक दुर्घटना घडलेल्या आहेत. मात्र, तरीही लोकांना शहाणपण येत नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. सध्या मोबाईल फोन ही दैनंदिन गरजेची वस्तू बनली असली आणि अनेक प्रकारची कामेही मोबाईलमुळे होत असली, तरी आपल्या जीवापेक्षा मोबाईल फोन अधिक झालेला नाही, हे समजणे गरजेचे आहे. मोबाईल फोन हरवू नये, पडू नये यासाठी धडपडणारे अनेक असतात. आता २३ वर्षांची एक ऑस्ट्रेलियन तरुणी डोंगरावर मोठ्या दगडांच्या उतरंडीत मोबाईल फोन पडल्यावर तो काढण्याच्या प्रयत्नात स्वतःच घसरून दगडांच्या खोबणीत उलटी पडली व तब्बल दोन तास तिला वर पाय व खाली डोके अशा स्थितीत दगडांच्या पोकळीत काढावे लागले!


या तरुणीने आपल्या जीविताची आशाही सोडून दिली होती. तिचे या स्थितीमधील तसेच तिला वाचवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबाबतचे फोटो आता सोशल मीडियात व्हायरल झाले आहेत. 'न्यूयॉर्क टाईम्स'च्या वृत्तानुसार २३ वर्षांची मटिल्डा कॅंपबेल आपल्या मित्रांसह ऑस्ट्रेलियातील सिडनी शहरापासून १५० मैलांवर असलेल्या हंटर व्हॅलीमध्ये फिरण्यासाठी गेली होती. त्यावेळी डोंगरावरील मोठ्या शिळांच्या फटीत तिचा मोबाईल फोन पडला. तो काढण्याच्या प्रयत्नात मटिल्डाचा पाय घसरला आणि ती डोक्यावर पडली. दोन दगडांच्या मोठ्या फटीमध्ये ती खाली डोके व वर पाय अशा स्थितीत अडकून पडली. सुरुवातीला तिच्या मित्रांनी तिला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला; पण वजनदार दगड आणि अतिशय अडचणीची जागा असल्याने त्यांना यश आले नाही. शेवटी त्यांनी इमर्जन्सी हेल्पलाईनवर कॉल करून मदत मागितली. सुमारे तासाभरानंतर तिथे बचाव कर्मचारी पोहोचले. त्यांनी तेथील ५०० किलो वजनाचे अनेक दगड हटवले. त्यासाठी त्यांनी तारा, दोरखंड अशा अनेक साधनांचा वापर केला. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले व तिला सुखरूप बाहेर काढले. ◆◆◆

## सामना ब्रेन हॅमरेजचा

मेंदू हा मानवी शरीरातील सर्वात जटिल आणि संवेदनशील अवयव असून त्याचे कार्य अखंड चालू ठेवण्यासाठी सातत्याने आणि समतोल रक्तपुरवठा आवश्यक असतो. मात्र, मेंदूतील रक्तवाहिन्यांपैकी एखादी अचानक फुटली किंवा त्यातून रक्तस्राव होऊ लागला, तर त्याला 'मेंदूतील रक्तस्राव' म्हणजेच ब्रेन हॅमरेज असे म्हणतात. ही स्थिती आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक असते कारण रक्तस्राव झाल्यामुळे मेंदूच्या पेशींवर दाब निर्माण होतो, त्या पेशींना पुरेशा प्रमाणात प्राणवायू मिळत नाही आणि त्यामुळे त्या मृत होण्याचा धोका वाढतो. या अवस्थेमुळे रुग्णाच्या शरीरातील अनेक कार्ये तात्काळ बंद पडू शकतात आणि काही वेळा मृत्यूदेखील होऊ शकतो.

मेंदूतील रक्तस्राव हा 'स्ट्रोक'चे एक रुप आहे. विशेषतः ही अवस्था हेमोरेजिक स्ट्रोक म्हणून ओळखली जाते. काही रुग्णांमध्ये रक्तवाहिन्यांमध्ये गाठी किंवा कमकुवतपणा असतो. अशा वेळी पडण्यामुळे, अपघातामुळे किंवा मार लागल्यामुळे त्या कोणत्याही क्षणी फुटण्याची आणि अचानक रक्तस्राव होण्याची शक्यता असते. गंभीर स्वरूपाच्या रक्तस्रावात शस्त्रक्रियेची गरज भासते.

काही वेळा शस्त्रक्रियेनंतरही मेंदूत रक्ताची गुठळी पुन्हा तयार होण्याची शक्यता असते. त्यामुळे हाता-पायांची हालचाल करण्यात अडथळा निर्माण होणे, हातांना संवेदना न जाणवणे, हातांनी काही उचलता न येणे अशी लक्षणे दिसू लागतात. अशा वेळी पुन्हा शस्त्रक्रिया करण्याशिवाय पर्याय उरत नाही. मुळात, जेव्हा एखाद्या आजारावर, व्याधीवर औषधोपचार उपलब्ध नसतील तेव्हा शस्त्रक्रियेचा मार्ग निवडला जातो. पण पर्याय उपलब्ध असताना त्याचा अवलंब का करु नये? वास्तविक पाहता, अशा रुग्णांसाठी होमिओपॅथी उपचारपद्धती प्रभावी ठरत असल्याचे दिसून आले आहे.



मध्यंतरी एका साठ वर्षीय गृहस्थांना एकदा मेंदूची शस्त्रक्रिया झाल्यानंतरही पुन्हा हातांमध्ये संवेदना (सेन्सेशन्स) न जाणवणे, वस्तू उचलता न येणे अशी लक्षणे दिसू लागली होती. त्यांना न्युरोसर्जननी पुन्हा ऑपरेशन करण्याचा सल्ला दिला होता. परंतु त्यांनी शस्त्रक्रियेस तीन महिन्यांचा कालावधी असल्याने यादरम्यान होमिओपॅथी उपचार घेण्याचे ठरवले.

होमिओपॅथी ही एक पर्यायी आणि सखोल सैद्धांतिक पाया असलेली प्रणाली म्हणून ओळखली जाते. होमिओपॅथी एका विशिष्ट तत्त्वावर आधारित आहे. होमिओपॅथी ही केवळ लक्षणांवर उपचार करणारी पद्धत नाही, तर ती माणसाच्या संपूर्ण प्रकृतीचा अभ्यास करते आणि शरीरातील नैसर्गिक संतुलन पुनःस्थापित करण्यास मदत करते. प्रत्येक माणसामध्ये एक जीवनशक्ती किंवा व्हायटल फोर्स असतो. ही जीवनशक्ती त्याच्या आरोग्याची राखण करते. जेव्हा ही शक्ती असंतुलित होते, तेव्हा रोग होतो. होमिओपॅथिक औषधे या जीवनशक्तीला बळ देतात, त्याचे संतुलन पुन्हा प्रस्थापित करतात आणि नैसर्गिकरित्या शरीरास आजारांशी लढण्यास सक्षम करतात. रोगाच्या किंवा व्याधीच्या मुळाशी जाऊन दिलेल्या उपचारांमुळे शरीरात त्या आजारांविरुद्ध नैसर्गिक प्रतिकारशक्ती विकसित होते. भारत सरकारच्या आयुष मंत्रालयानेही कोविड काळात याची शिफारस केली होती.


रुग्णावर उपचार करताना होलिस्टिक म्हणजेच सर्वंकष विचार करुन औषधे दिली जातात. यासाठी रुग्णाचा स्वभाव, व्यक्तिमत्व, सवयी, शरीराची ठेवण या सर्वांचा सूक्ष्म अभ्यास केला जातो. हा सर्व विचार करुन मग औषधोपचार केले जातात. औषधोपचार सुरू झाल्यानंतर रुग्णाची झोपेची गुणवत्ता सुधारते, शांत झोप लागते, पचनक्रिया सुरळित होऊन भूक वाढते. या सर्व गोष्टी रुग्णाची प्रतिकारशक्ती वाढत असल्याचे संकेत देणाऱ्या असतात. शरीराच्या या प्रतिकारशक्तीचा उपयोग करुन तिच्या साहाय्याने व्याधींशी सामना केला जातो आणि रुग्णांना आजारातून बरे केले जाते. रोगप्रतिकारशक्ती ही निसर्गतः लाभलेली असतेच; पण ती कमी पडत असल्यामुळे विविध प्रकारच्या व्याधी निर्माण होतात, संसर्ग होतात. पण ती अधिक सक्षम केल्यास आजारांविरुद्धची लढाई जिंकता येणे सहजशक्य होते. सदर रुग्णाबाबतही त्यांच्या एकूण जीवनशैलीचा, व्यक्तिमत्वाचा अभ्यास करुन केलेल्या उपचारांमुळे हातातील संवेदना पुन्हा निर्माण झाल्या, हालचाली पूर्ववत झाल्या. परिणामी, दुसऱ्यांदा करावी लागणारी शस्त्रक्रिया टळली.

'न्यूरोलॉजी' या अमेरिकन अकादमी ऑफ न्यूरोलॉजीच्या वैद्यकीय जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासामध्ये जर्मनीतील युनिव्हर्सिटी मेडिकल सेंटर हॅम्बुर्ग-एपेनडॉर्फ येथील न्यूरोसर्जन डॉ. ऑलिव्हर हीजे यांनी स्पष्टपणे नमूद केले की, होमिओपॅथीसारख्या पर्यायी उपचारांचा वापर बहुतांश वेळा दुर्लक्षित किंवा कमी लेखला जातो. पण वैद्यक व्यावसायिकांनी रुग्णांच्या पर्यायी उपचार घेण्याच्या इच्छेचा आदर केला पाहिजे. होमिओपॅथी ही सर्वंकष उपचारपद्धती असल्याने दुर्धर व्याधींमध्येही ती प्रभावी ठरते.

**– डॉ. नितीन दर्डा,**
संपर्क ९४२०८६१४५७

## 'हा' आहे पृथ्वीवरील शेवटचा रस्ता...

जग कुठे संपतेय, जगाचे शेवटचं टोक कुठे आहे, असे प्रश्न फक्त लहान मुलांनाच नाही, तर सगळ्यांच्याच मनात कधी ना कधी तरी येत असतात. जगाचे शेवटचे टोक कुठे आहे, हे माहिती नसले तरीही जगाचा शेवटचा रस्ता कोणता, हे निश्चित झाले आहे. या रस्त्याला जगातील अखेरचा रस्ता मानले जाते. या रस्त्यानंतर जग संपत असल्याचे देखील मानले जाते. पृथ्वीवरील या शेवटच्या रस्त्याचे नाव 'ई-६९' असे आहे.



'ई-६९' हा पृथ्वीवरील शेवटचा आणि सर्वात खतरनाक रस्ता मानण्यात येतो. ई-६९ एक महामार्ग आहे. हा महामार्ग १४ किलोमीटर लांबीचा आहे. या महामार्गावर अशी अनेक ठिकाणे आहेत, जेथे एकट्याने पायी चालण्यास किंवा वाहनाने प्रवास करण्यास मनाई आहे. पृथ्वीवरील हा शेवटचा आणि सर्वात डेंजर रस्ता नॉर्वे देशात आहेत. आर्क्टिक म्हणजेच उत्तर ध्रुवाच्या वर्तुळाजवळ असलेला नॉर्वे हा देश जगातील त्या अर्थाने शेवटचा देश असून, या देशातील ई-६९ हा पृथ्वीवरचा शेवटचा रस्ता मानला जातो. ई-६९ रस्ता हा पृथ्वीचे उत्तर टोक आणि नॉर्वेला जोडणार आहे. या रस्त्याच्या पुढे कुठलाच रस्ता जात नाही. हा रस्ता संपल्यानंतर पुढे फक्त बर्फ आणि बर्फाळ समुद्र दिसून येतो. जगातील अखेरचा रस्ता असल्याने अनेक पर्यटकांना हा रस्ता पाहण्याची इच्छा असते. पण, या रस्त्यावरून प्रवास करणे इतके सहज शक्य नाही. या रस्त्यावर एकट्याने जाणे किंवा ड्रायव्हिंग करण्यावर बंदी आहे. जर जगातील अखेरच्या रस्त्याची सैर करायची असेल, तर चार-पाच जणांच्या ग्रुपसोबतच जावे लागेल. त्याशिवाय या रस्त्यावर प्रवास करण्याची परवानगी दिली .

## हरणाच्या बेंबीपासून परफ्यूम



जंगलात एक कस्तुरी मृग राहतो, ज्याच्या बेंबीचा सुगंध हा जगातील सर्वात आकर्षक असा सुगंध आहे, हे कविता आणि निबंधांमध्ये वाचत आलो आहोत. तर या सुगंधाची इच्छा इतकी प्रबळ आहे की तो सुगंध मिळविण्यासाठी मानवाने मोठ्या प्रमाणावर हरणांची शिकार केली आहे. अनेक लोक यावर विश्वास ठेवत नाहीत. याला केवळ एक गैरसमज मानतात. पण, खास मृग (हरीण) 'कस्तुरी' आणि त्यातून येणाऱ्या अप्रतिम सुगंधाविषयी काही वास्तविक तथ्ये लक्षवेधी आहेत. प्रकृती पर्यावरण आणि वन्यजीव सोसायटीचे प्रोजेक्ट मॅनेजर अभिषेक यांनी याबाबत माहिती दिली. ते मागील २५ वर्षांपासून वन्यजीवांसह काम करत आहेत. त्यांनी सांगितले की, 'कस्तुरी' एक विशेष हरीण आहे, जे सामान्य हरीण आणि काळवीटपेक्षा वेगळे आहे. याला इंग्रजीत 'मस्क डियर (कस्तुरी मृग)' असे म्हणतात. हे मुळात एंटीलोप हरणांच्या प्रजातीमध्ये येतात. त्यांचे म्हणणे आहे की, कस्तुरी मृगाच्या बेंबीत एक थैली असते, जी 'कस्तुरी' नावाच्या सुगंधी पदार्थाने भरलेली असते. जगातील सर्वोत्तम परफ्यूममध्ये त्याची गणना केली जाते, इतका हा पदार्थ इतका सुगंधित आहे.

आणखी एक आश्चर्य म्हणजे कस्तुरी (मस्क) जो जगातील सर्वोत्तम परफ्यूमपैकी एक परफ्यूम आहे, तो कस्तुरीपासून बनवला जातो, म्हणून त्याला 'कस्तुरी' म्हणतात. अभिषेक यांनी दिलेल्या माहितीनुसार, जसजशी हरणांची वाढ होते तसतसे त्यांच्या बेंबीतील कस्तुरीचा सुगंधही वाढतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हा आकर्षक पदार्थ फक्त नर हरणांमध्येच आढळतो. तर मादी कस्तुरीपासून वंचित राहतात. हरणाच्या बेंबीचा आकार चामड्याच्या बॉलसारखा असतो. यामध्ये सुगंधी पदार्थ अर्ध-घन (जेली सारख्या) स्वरुपात भरलेला असतो. कस्तुरीचा सुगंध हलका, आकर्षक आणि दीर्घकाळ टिकणारा असतो. तसेच त्याची किंमत ३० हजार रुपये प्रति ग्रॅमपर्यंत असल्याचे सांगितले जाते.

## उष्ण आवरणाचा बाह्यग्रह

गिआपल्या ग्रहमालिकेतील सर्वात मोठा ग्रह असलेला गुरू हा निव्वळ वायूचा मोठा गोळा आहे. त्याच्यावर उष्ण व दाट असे आवरण असते. असेच उष्ण, दाट आवरण असलेला बाह्यग्रह शोधण्यात आलेला असून तो पृथ्वीपासून १८०० प्रकाशवर्षे दूर आहे. सूर्यासारख्या सहा अब्ज वर्षे जुन्या ताऱ्याभोवती हा ग्रह फिरत असून अधिक्रमणामुळे तो सापडला आहे. ग्रहाचे नाव एपिक २२०५०४३३८ बी असे असून तो नासाच्या केप्लर के २ मोहिमेत प्रथम शोधला गेला.



चिलीच्या पॉंटिफिकल कॅथोलिक विद्यापीठाचे नेस्टर एस्पिनोझा यांनी युरोपीय खगोल संशोधन संस्थेच्या इशेली वर्णपंक्ती यंत्रणेचा (फेरॉस) वापर करून पाठपुराव्याचे संशोधन केले. फेरॉस यंत्रणेमुळे एपिक २२०५०४३३८ बी या गुरुसारख्या उष्ण ग्रहाची निरीक्षणे शक्य झाली.


मातृताऱ्यासमोर त्याचे अधिक्रमण झाले ते पाहता आले. धातूंनी परिपूर्ण असलेल्या गुरूसारख्या ग्रहाचा शोध फोटोमेट्री तंत्राने लावण्यात आला आहे. एपिक २२०५०४३३८ बी हा वायूरूप व महाकाय ग्रह आहे त्याची गुणवैशिष्ट्ये ही गुरूसारखीच आहेत. त्याचा कक्षीय काळ १० दिवसांपेक्षा कमी आहे. पृष्ठीय तापमान जास्त, ताऱ्याच्या निकट अशी नवीन ग्रहाची वैशिष्ट्ये आहेत. या संशोधनानुसार एपिक २२०५०४३३८ बी हा ग्रह गुरूपेक्षा १० टक्क्यांनी लहान आहे, तर त्याचे वस्तुमान गुरूपेक्षा ३० टक्के अधिक आहे. तो ताऱ्याभोवती ५.८ दिवसांत प्रदक्षिणा पूर्ण करतो. त्याची घनता २.२ प्रतिघनसेंटिमीटर आहे व त्याचे समतोल तापमान ८८६ अंश सेल्सियस असून तो गुरूसारखा तप्त असून वस्तुमान मात्र थोडे कमी आहे.

## समस्या फ्रोजन शोल्डरची

फ्रोजन शोल्डर किंवा ॲडहेसिव्ह कॅप्स्युलायटीस हा खांद्याचा एक सामान्य व दीर्घकालीन विकार आहे. यामध्ये खांद्याच्या सांध्याभोवती असलेल्या ऊतींमध्ये सूज येते, जाडसरपणा व घट्टपणा निर्माण होतो. परिणामी, खांद्याची हालचाल अत्यंत मर्यादित होते. या विकारामध्ये रूग्णास तीव्र वेदना, खांदा हलवण्यात अडथळा आणि दैनंदिन कामांमध्ये अडचणी जाणवतात. सुरुवातीला सौम्य वाटणारा हा त्रास हळूहळू वाढत जातो. वेदना, हालचालींचा अडथळा आणि स्नायूंचा जडसरपणा यामुळे रुग्ण हैराण होतो. सुरुवातीस हलक्याफुलक्या हालचालींमध्ये अडथळा येतो पण नंतर दैनंदिन कामांमध्येही अडचण निर्माण होते.

खांद्याची रचना आणि कार्यप्रणाली

मानवी खांदा हा बॉल-अँड-सॉकेट प्रकारच्या सांध्याचा एक अत्यंत लवचिक व महत्त्वाचा भाग आहे. या सांध्यामध्ये वरच्या हाताचे हाड (ह्युमरस), खांद्याचा पाट (स्कॅप्युला) आणि कॉलर बोन (क्लॅव्हिकल) यांचा समावेश असतो. या सांध्यास वेढून ठेवणाऱ्या ऊतींना कॅप्स्युल म्हणतात. या कॅप्स्युलमध्ये सायनोव्हियल फ्लुइड असतो जो सांध्यास योग्य प्रमाणात वंगण (लुब्रिकेशन) देतो. फ्रोजन शोल्डरमध्ये या कॅप्स्युलमध्ये सूज येते, ऊती जाडसर होतात आणि चिकट बनतात. याला ॲढ्हेशन म्हणतात. त्यामुळे सांध्यामध्ये हालचाल करताना वेदना व अडथळा निर्माण होतो.



**फ्रोजन शोल्डरच्या टप्प्यावार लक्षणांची वाढ :**

**१. फ्रीझिंग स्टेज** : या टप्प्यात हळूहळू वेदना वाढतात. संध्याकाळी किंवा रात्री वेदना अधिक जाणवतात. खांद्याची हालचाल कमी कमी होत जाते. हा टप्पा ६ आठवड्यांपासून ९ महिन्यांपर्यंत चालतो.

**२. फ्रोजन स्टेज** : या टप्प्यात वेदना काहीशी कमी होते, पण खांद्याचा जडपणा खूप वाढतो. खांदा हलवणे अत्यंत कठीण होते. कपडे घालणे, केस विंचरणे, डबा उचलणे यासारख्या साध्या कामातही अडचण येते. हा टप्पा ४ ते ६ महिने टिकतो.

**३. थॉईंग स्टेज** : या टप्प्यात हळूहळू हालचाली पूर्ववत होतात. वेदना कमी होतात व खांद्यामधील जडसरपणा कमी होतो. पूर्ण बरे होण्यासाठी ६ महिने ते २ वर्ष लागू शकतात.

**कारणे** : या विकारामागे ठोस कारण निश्चित नाही. मात्र काही विशिष्ट परिस्थितींमध्ये हा त्रास जास्त आढळतो. मधुमेह (डायबेटीस): या विकाराच्या रूग्णांमध्ये फ्रोजन शोल्डरची शक्यता अधिक असते. थायरॉईड विकार: हायपोथायरॉईड किंवा हायपरथायरॉईडच्या रूग्णांमध्येही हा त्रास दिसतो. याशिवाय, हृदयरोग व पार्किन्सनसारखे आजार असल्यास, शस्त्रक्रिया किंवा अपघातानंतर खांद्याची हालचाल कमी झाल्यास ही समस्या अधिक जाणवण्याची शक्यता असते. महिलांमध्ये, विशेषतः ४० ते ६० वयोगटात फ्रोझन शोल्डरची समस्या जाणवण्याची शक्यता अधिक असते.

**लक्षणे** : खांद्यामध्ये बोथटपणा आणि सतत वेदना जाणवतात. विशेषतः बाहेरील भागात व कधी कधी वरच्या हातात वेदना जाणवतात. हालचाल करताना वेदना वाढते.

हालचालींची मर्यादा येतात. स्वतःहून किंवा दुसऱ्याच्या मदतीनेही खांदा हलवता येत नाही. रुग्णाचा वैद्यकीय इतिहास, लक्षणे व शारीरिक तपासणी ह्यांच्या आधारे निदान होते. सुयोग्य पद्धतीने उपचार घेतल्यास फ्रोजन शोल्डर सर्जरीशिवाय बरा होतो. उपचाराचा उद्देश वेदना कमी करणे, हालचाल वाढवणे व पुन्हा ताकद येण्यासाठी मदत करणे हा असतो. फ्रोजन शोल्डरमध्ये रुग्णाने संयम बाळगणे फार महत्वाचे असते. हा त्रास बरा होण्यास काही काळ जावा लागतो.

**– डॉ. सम्यक पंचोली,**
संपर्क ८९८९३२९३२९
(लेखक अस्थिरोग तज्ज्ञ असून शोल्डर आणि अप्पर लिंब सर्जन आहेत.)

# महानगरपालिकेवर प्रशासन राज आल्यापासून नागरिकांचे मूलभूत प्रश्न देखील मार्गी लागत नाही

## विविध प्रश्न तातडीने मार्गी लावून द्या अन्यथा आंदोलन : माजी नगरसेवक अशोक बडे यांचे आयुक्तांना निवेदन

नगर – प्रभाग क्रमांक ७ मधील भोर कॉलनी, विजयनगर कॉलनी, म्हस्के कॉलेज स्नेहनगर, पितळे कॉलनी, सिद्धेश्वर कॉलनी, पितळे कॉलनी, व्यंकटेश कॉलनी, आदर्शनगर, ओमनगर, माताजी कॉलनी परिसरातील स्ट्रीट लाईट अनेक महिन्यांपासून बंद असून या परिसरामध्ये अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. या भागामध्ये एमआयडीसी परिसरामध्ये काम करणारा कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात असून त्यांना रात्री अपरात्री कामावरून घरी जात असताना विविध संकटांना सामोरे जावे लागत आहे. तसेच मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट मोठ्या प्रमाणात असून अंधारामुळे नागरिकांवर हल्ला करत आहे. नागापूर अमरधाम येथे लाईटची व्यवस्था नसल्यामुळे अंत्यविधी करताना नागरिकांना विविध अडचणीला सामोरे जावे लागत आहे. अंत्यविधी वेळी जनरेटरची व्यवस्था करावी लागत आहे. महापालिका प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करून अधिकाऱ्यांना फोन देखील केले असून लाईटचा प्रश्न मार्गी लागत नाही. प्रभागातील ओढे नालेसफाई काम झाले नसल्यामुळे गटारी अक्षरशा तुंबल्या आहे, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे याचबरोबर प्रभागातील विविध कॉलनी अंतर्गत रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून त्याचे पॅचिंगचे काम मार्गी लावणे गरजेचे आहे. तसेच नागपूर, बोल्हेगाव परिसर हा नव्याने विकसित होणारा भाग असून या भागांमध्ये फेज २ योजनेअंतर्गत पाईपलाईन टाकून मिळावी. प्रभागामध्ये चार ते पाच दिवस पाणी येत नसल्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. विस्कळीत झालेला पाणीपुरवठा सुरळीत करून किमान दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात यावा.


नागरिकांचे मूलभूत प्रश्न देखील मार्गी लावण्याबाबत आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देताना अशोक बडे आदी. (छाया : लहू दळवी)

प्रभागातील कचऱ्याचा प्रश्न गंभीर बनला असून घंटागाडी नागरिकांच्या घरी आठ ते दहा दिवस झाले तरी येत नाही. नागरिकांना कचरा रस्त्यावर फेकून द्यावा लागतो. त्यामुळे सर्वत्र कचऱ्याचे साम्राज्य दिसत आहे. कचरा संकलनाचे काम देखील होत नाही. त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. महापालिकेवर प्रशासन राज आल्यापासून नागरिकांचे मूलभूत प्रश्न देखील मार्गी लागत नसल्यामुळे नागरिक महापालिकेच्या कामकाजावर नाराज आहे. प्रभागातील नागरिकांचे विविध प्रश्न तातडीने मार्गी लावून द्या अन्यथा आंदोलन केले जाईल असा इशारा माजी सभागृहनेते अशोक बडे यांनी मनपा आयुक्त यांना निवेदनाद्वारे दिला. यावेळी भाकचंद भाकरे, अनिल फुंदे उपस्थित होते.

महानगरपालिकेतील विविध विभागाचे अधिकारी काम सांगितल्यानंतर वेळेवर करत नाही, आम्ही कधीही आमच्या घरचे कामे सांगितले नाही, जनतेचे कामे मार्गी लागत नसल्यामुळे नागरिक महापालिकेवर नाराजी व्यक्त करत आहे, तरी प्रशासनाने नागरिकांच्या प्रश्नाकडे लक्ष देऊन तातडीने ते सोडवणे गरजेचे आहे असे मत अशोक बडे यांनी व्यक्त केले

# कॉम्प्युटर सायन्स व डिझाईन इंजिनीअरींग हे आधुनिक तंत्रज्ञान यांचा नवसंकल्प संगम

नगर – आजच्या वेगाने विकसित होत असलेल्या डिजिटल जगात, जिथे तंत्रज्ञान आपल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये व्यापलेले आहे. तिथे केवळ अत्याधुनिक प्रणाली तयार करू शकणाऱ्याच नव्हे, तर त्या अंतर्जानी, आकर्षक आणि वापरकर्ता–अनुकूल आहेत याची खात्री करू शकणाऱ्या व्यावसायिकांची मागणी प्रचंड वाढली आहे. अशा वेळी कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड डिझाईन इंजीनियरिंग म्हणजेच आधुनिक तंत्रज्ञान आणि नवसंकल्पाचा संगम आहे, असे प्रतिपादन विभाग प्रमुख डॉ.रवींद्र तांबे यांनी केले.


डॉ.रवींद्र तांबे

विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना विविध कोर्सेस बाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी डॉ.तांबे बोलत होते. ते पुढे म्हणाले आपल्या वाढत्या गरजेमुळे एक विशेष आणि आंतरविद्याशाखीय (इंटरडीसिप्लीनर) शाखा उदयास आली आहे: संगणक विज्ञान आणि डिझाइन अभियांत्रिकी (कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड डिझाईन इंजीनियरिंग).

परंपरेनुसार, संगणक विज्ञान प्रामुख्याने कॉम्प्युटिंगची अल्गोरिदम प्रोग्रामिंग भाषा (प्रोग्रामिंग लँग्वेज) आणि सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटवर लक्ष केंद्रित करत असे. डिझाइन, दुसरीकडे, अनेकदा एक स्वतंत्र शाखा मानली जात असे, जी सौंदर्यशास्त्र, उपयोगिता आणि वापरकर्ता अनुभवावर (यूजर एक्सपिरीयन्स) लक्ष केंद्रित करत असे. संगणक विज्ञान आणि डिझाइन अभियांत्रिकी ही दरी भरून काढते, ज्यामुळे असे पदवीधर तयार होतात ज्यांना संगणक विज्ञानाच्या मूळ तत्त्वांचा मजबूत पाया असतो. त्याचबरोबर डिझाइन थिंकिंग मानवी–संगणक संवाद (ह्यूमन कॉम्प्युटर इंटरॅक्शन एच सी एल) आणि नवीन मीडिया तंत्रज्ञानामध्ये (न्यू मीडिया टेक्नॉलॉजी) ते पारंगत असतात.

या बाबींचा विचार करुन डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात नव्याने कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड डिझाईन (सी.एस.डी.) ही शाखा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. जेणेकरुन विद्यार्थ्यांना संगणक क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग होईल आणि त्यांचे कौशल्य विकसित होईल.

ही शाखा नेमकी काय आहे? त्याचा काय फायदा होणार आहे हे त्यांनी सांगितले.

सी.एस.डी. इंजिनीअरींग ही एक आंतरशाखीय (इंटरडिससीप्लीन) शाखा आहे जी कंप्यूटर सायन्समधील तांत्रिक विषय जसे की प्रोग्रॅमिंग, अल्गोरिदम, डेटा स्ट्रक्चर्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, यासोबतच डिझाईन विचारसरणी (डिझाईन थिंकिंग) डिझाईन, ग्राफिक डिझाईन आणि मानवी–कंप्यूटर संवाद यांचा अभ्यास करायला शिकवते, असे डॉ.रविंद्र तांबे यांनी शेवटी स्पष्ट केले.

# नगरमध्ये ३ ऑगस्ट रोजी राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धा

नगर – युनिव्हर्सल अबॅकस ॲण्ड वैदिक मॅथ्स असोसिएशनच्या वतीने ३ ऑगस्ट रोजी राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. एमआयडीसी येथील स्नेहालयात होणाऱ्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांना सहभागी होण्याचे आवाहन असोसिएशनचे अध्यक्षा हेमलता काळाणे व व्यवस्थापन समितीचे उज्वला मुरकुटे यांनी केले आहे.

रविवारी सकाळी या स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. तर दुपारच्या सत्रात आमदार संग्राम जगताप व माजी महापौर अभिषेक कळमकर यांच्या अध्यक्षतेखाली बक्षीस वितरणाचा कार्यक्रम होणार आहे. यावेळी माजी नगरसेविका दिपालीताई बारस्कर, मीरा बारस्कर, मेकअप आर्टिस्ट शितल धापटकर, डॉ. शजाउद्दीन सय्यद, प्राचार्या स्टीफन डिसोजा, स्नेहालयाचे अनिल गावडे, हनिफ शेख, प्राचार्या सविता वाव्हळ, नितीन उदमले, मनीषा जाधव यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

ही स्पर्धा ज्युनिअर, मास्टर ज्युनिअर, लेवल १ ते ५ व वैदिक मॅथ्स या गटात होणार आहे. ही स्पर्धा सकाळच्या सत्रात पार पडणार असून, सर्व गटातील पहिल्या पाच क्रमांकाच्या विजेत्यांना आकर्षक ट्रॉफीसह बक्षीस दिले जाणार आहे. सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देण्यात येणार असल्याचे म्हटले आहे.

# शिक्षक बदलीत संवर्ग १ च्या आजारी शिक्षकांची सरसकट तपासणी थांबवा, संशय असलेल्यांच्या आजारपणाची व वैद्यकीय प्रमाणपत्राची चौकशी व्हावी

### बहुजन समाज पार्टीचे प्राथमिक शिक्षण विभागाला निवेदन

नगर – जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक संवर्ग बदली २०२५ अंतर्गत संवर्ग १ मधील बदली करताना संशय असलेल्या व्यक्तींना बोलावून त्यांच्या आजारपणाची व वैद्यकीय प्रमाणपत्राची चौकशी करावी. सरसकट सर्व आजारी शिक्षकांना तपासणीला बोलावून त्यांच्या आरोग्याची हेळसांड थांबविण्याची मागणी बहुजन समाज पार्टीच्या वतीने करण्यात आली आहे.

शिष्टमंडळाने प्राथमिक शिक्षण विभागाच्या उपशिक्षणाधिकारी मीना शिवगुंडे यांची भेट घेऊन या संदर्भात निवेदन दिले. यावेळी जिल्हाध्यक्ष सुरेश कांबळे, जिल्हा प्रभारी सुनील ओव्हळ, जिल्हा उपाध्यक्ष शहानवाज शेख, सलीम अत्तार, बाळासाहेब काटे, जिल्हा महासचिव राजू शिंदे, तस्लीम शेख आदी उपस्थित होते.

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हा परिषद अंतर्गत सन २०२५ ऑनलाईन बदली प्रक्रिया सुरु आहे. संबंधित शिक्षकांनी सादर केलेले आजारपणाचे वैद्यकीय प्रमाणपत्र ससून रुग्णालय व जे.जे. रुग्णालय मुंबई या ठिकाणाहून आणलेले आहेत. अशा रुग्णांना पुन्हा या ठिकाणी मेडिकल बोर्ड समोर हजर होणे व तपासणी करणे त्रासदायक आहे. यामुळे शिक्षक असलेल्या आजारी व्यक्तींना आर्थिक, मानसिक व शारीरिक त्रास होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

ज्यांच्या बाबत संशय आहे, ज्यांनी हे प्रमाणपत्र दिले नाही अशा रुग्णांना बोलावून त्यांची चौकशी होणे आवश्यक आहे. मात्र सरसकट सर्व रुग्णांना बोलवून त्यांना एक प्रकारे त्रास देण्याचा प्रकार सुरू आहे. यामध्ये काही गंभीर आजारांचे व वयस्कर रुग्ण आहेत. अशा रुग्णांना पुन्हा बोलावून विनाकारण त्रास होणार नाही, याची काळजी घेण्याचे निवेदनात म्हटले आहे.


सरसकट सर्व आजारी शिक्षकांना तपासणीला बोलावून त्यांच्या आरोग्याची हेळसांड थांबविण्याची मागणी बहुजन समाज पार्टीच्या शिष्टमंडळाने प्राथमिक शिक्षण विभागाच्या उपशिक्षणाधिकारी मीना शिवगुंडे यांची भेट घेऊन या संदर्भात निवेदन दिले.

# पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेच्या प्रवेश अर्जासाठी वेळापत्रक निश्चित

नगर – इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी तसेच वसतीगृह योजनेपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजने अंतर्गत प्रवेश अर्ज ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात येणार असून, पात्र लाभार्थ्यांनी वेळापत्रकानुसार अर्ज सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक विनोद लोंढे यांनी केले आहे.

बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. अशा बारावीनंतरच्या पदवी अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसह एम.ए., एम.एस्सी. अशा पदवीनंतरच्या पदव्युत्तर (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) अभ्यासक्रमांमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शासनाच्या https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर १ ते १७ ऑगस्ट दरम्यान प्रवेशासाठी अर्ज सादर करावेत.

१८ ते २१ ऑगस्ट या कालावधीत अर्जांची छाननी करण्यात येणार असून, गुणवत्तेनुसार पहिली निवड यादी २२ ऑगस्ट रोजी जाहीर केली जाईल. पहिल्या यादीतील विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाची अंतिम मुदत ४ सप्टेंबर २०२५ पर्यंत राहणार आहे. रिक्त जागांसाठी प्रतीक्षा यादीतील गुणवत्तेनुसार दुसरी निवड यादी ५ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. दुसऱ्या निवड यादीतील विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाची अंतिम तारीख १५ सप्टेंबर निश्चित करण्यात आली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर ठरलेला असून त्यापोटी आमच्या अशिलाकडून विद्यमान मालकांनी विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत विद्यमान मालकाच्या मालकीची व वहिवाटीची असून सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिध्दीस दिली. **ता. १/८/२०२५**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी व तालुका अहिल्यानगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे **नालेगांव** येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत –

**सर्व्हे नं.२८ चे क्षेत्र ० हे. ०५ आर याचा आकार ० रू. १४ पैसे ही संपूर्ण शेतजमीन मिळकत – यांसी चतु:सिमा :**

पुर्वेस – लागू सर्व्हे नं. २९ दक्षिणेस – लागू रेल्वे लाईन

पश्चिमेस – लागू रेल्वे लाईन उत्तरेस – लागू सर्व्हे नं.२७

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक – १. संगिता बाळासाहेब सांगळे उर्फ संगिता गणेश सांगळे, २. किरण सुभाष सांगळे, ३. महेश सुभाष सांगळे, ४. तुषार सुभाष सांगळे, ५. अशोक माधव ओहोळ, ६. पोपट माधव ओहोळ, ७. संजय माधव ओहोळ, ८. मालुबाई संजय बेदरकर, ९. पुष्पा शिवाजी ओहोळ, १०. सागर शिवाजी ओहोळ व ११. सुरज शिवाजी ओहोळ**

सर्व रा. माळीवाडा, अहिल्यानगर.

**ॲड. समीर वखारे**

पत्ता :– ऑफीस नं. ५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर. मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९



## जाहिर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **१. आमान फजल शेख, २. मिनाज फजल शेख, दोघेही रा. मेहराज मस्जिद जवळ, मुकुंदनगर, अहमदनगर** यांच्या मालकीची असुन सदर मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलांबरोबर ठरलेला असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. विद्यमान मालक यांनी आमचे अशिलाकडून विसारादाखल रक्कम देखील स्वीकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु **कोणाचीही कोणतीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, साठेखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, गहाण,दान, बक्षिस, पोटगी हक्क व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस** त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ (सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल याची नोंद घेण्यांत यावी. दि.०१/०८/२०२५.

**परिशिष्ट- मिळकतीचे वर्णनः-** जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर),पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर (नगर) पैकी, अहिल्यानगर (अहमदनगर) महानगरपालिका हद्दीतील, मौजे भिंगार येथील खालील वर्णनाची मिळकत

| स.नं. | प्लॉट नं. | चौ.मीटर |
|---|---|---|
| ३३८/१ पैकी | ६८/६९/७०/२ | ७९.८८ |

**या हा संपूर्ण प्लॉट व त्यावरील रो – बंगलो नं. २ याचे तळ मजल्यावरील बांधकाम क्षेत्र ५२.१३ चौ.मी. व पहिल्या मजल्यावरील बांधकाम क्षेत्र ३८.७३ चौ.मी. असे एकुण बांधकाम क्षेत्र ९०.८६ चौ.मी, (प्रेमीयम बिल्टअप ३.०० चौ.मी) पहिल्या मजल्यावर ओपन टेरेस, पश्चिम बाजुस पोर्च, वॉल कंपाऊंड, व बाकीची मागे-पुढे खाली जागा व अमिनिटीसह इले.लाईट फिटींग हि संपुर्ण मिळकत.**

**यासी चतःसिमा-**

पुर्वेस – ओपन स्पेस दक्षिणेस – प्लॉट नं.६८/६९/७०/२३ (रो–बंगलो नं.३)

पश्चिमेस – ६ मीटर रस्ता उत्तरेस – प्लाट नं.६८/६९/७०/१ (रो–बंगलो नं.१)

**ॲड. तनवीर एम.शेख–** नोटरी पब्लिक (भारत सरकार)

**ॲड. गुफरान एफ.मोमीन, ॲड.मोहसीन आय.शेख**

कस्तुरी प्लाझा, डावरे गल्ली, अहमदनगर– मो.नं. ९२७०४६४६००/८०८७७४२४२८/९२०९५९७१५०


# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे

आज १ ऑगस्ट, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची आज १०५ वि जयंती. मराठी मातीत जन्मलेलं एक अनमोल रत्न म्हणजे अण्णाभाऊ साठे. अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शिधोजी साठे तर आईचे नाव वालुबाई. त्यांचे मूळ नाव तुकाराम असे होते. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची व हलाखीची त्यामुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. अण्णाभाऊ केवळ दीड दिवस शाळेत गेले बाकीचे सर्व शिक्षण मुंबईच्या झोपडपट्टीत झाले. मुंबईत सुरवातीला त्यांनी मिळेल ती कामे केली नंतर त्यांना मुंबईतील गिरणीमध्ये झाडूवाल्याची नोकरी मिळाली. तिथेच त्यांना कामगारांच्या कष्टमय, दुःखमय जीवनाचे दर्शन झाले. कामगारांचे, संप, मोर्चे पाहून त्यांनी त्यांचा लढाऊपणाही अनुभवला. १९३६ साली कामगार नेते श्रीपाद अमृत डांगे यांच्या विचारांनी प्रभावित होऊन ते कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते बनले. मुंबईत त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे ऐकली. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी ते इतके प्रभावीत झाले की त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपले गुरू मानले. वडीलांच्या निधनानंतर घरची जबाबदारी त्यांच्यावर पडल्यानंतर ते पुन्हा १ गावी आले. तिथे बापू साठे या त्यांच्या चुलतभावाच्या तमाशा फडात ते काम करू लागले. १९४२ च्या आंदोलनात सहभागी झाल्याने त्यांच्यावर पोलिसांनी पकड वारंट काढले. पोलिसांना चुकवत ते पुन्हा मुंबईला आले. मुंबईत आल्यावर लोकशाहीर म्हणून ते नावारूपास आले. १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने लाल बावटा या कलापथकाची त्यांनी स्थापना केली. पुढे त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाग घेतला. त्यांच्या शाहिरीत लावणी, पोवाडे, लोकनाट्ये यांचा समावेश असे. महाराष्ट्राची परंपरा, मुंबई कोणाची? ही त्यांनी लिहिलेली लोकनाट्ये खूप गाजली. अकलेची गोष्ट, देशभक्त घोटाळे, बेकायदेशीर, पुढारी मिळाला यासारखी त्यांनी लिहिलेली अनेक वगनाट्य लोकप्रिय झाली. अण्णाभाऊंच्या साहित्यात कथा कादंबरीची निर्मिती ठळकपणे नजरेत भरते. जिवंत काडतुसे, आबी, खुलंवाडी, बरबाद्या कंजारी, चिरागनगरची भुते, कृष्णाकाठच्या कथा हे त्यांनी लिहिलेले कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. अण्णाभाऊंनी ३५ कादंबऱ्या लिहिल्या. चित्रा, फकिरा, वारणेचा वाघ, माकडीचा माळ, रानगंगा, चिखलातील कमळ, वैजयंता या त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या खूप गाजल्या. फकिरा या त्यांच्या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. फकिरा ही आजही सर्वाधिक विकली जाणारी कादंबरी आहे. अनेक विद्यापीठात या कादंबरीचा अभ्यासक्रमात समावेश आहे. जो व्यक्ती अवघे दीड दिवस शाळेत गेला त्या व्यक्तीची साहित्य संपदा विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी ठेवण्यात आली हा आधुनिक युगातील एक चमत्कार आहे. म्हणूनच अण्णाभाऊ हे आधुनिक युगातील साहित्यरत्न आहे. त्यांच्या काही कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले. उपेक्षित गुन्हेगार म्हणून कलंकित ठरवले गेलेले दलित आणि श्रमिक यांच्या समृद्धीचे स्वप्न अण्णाभाऊ पाहत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर झालेले होते. जग बदल घालुनी घाव! सांगून गेले मज भीमराव! हे त्यांचे गीत खूप गाजले. माझी मैना गावाकडं राहिली... ही त्यांची लावणी तर अविस्मरणीय आहे. पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरलेली आहे असे ते नेहमी म्हणत. मानवी जीवनातील संघर्ष, नाट्य, दुःख, दारिद्र्य त्यांच्या साहित्यातून प्रकट होते. जगातील सत्तावीस भाषांमध्ये अण्णाभाऊंच्या साहित्याचे भाषांतर झाले आहे. १९५७ साली झालेल्या दलित साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. महाराष्ट्रातील विद्यापीठांत अण्णाभाऊंवर अकरा प्रबंध प्रसिद्ध केले गेले आहेत. पुणे विद्यापीठात त्यांच्या सन्मानार्थ अण्णाभाऊ साठे अध्यासन सुरू करण्यात आले आहे. असा हा पदादलितांच्या जीवनावर वास्तव लिहिणारा साहित्यरत्न १८ जुलै १९६९ रोजी कालवश झाला. आज त्यांची १०५ वि जयंती त्यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!


## अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## जाहिर नोटीस

अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील सर्व गुंठेवारी विकास केलेल्या नागरीकांना कळविण्यात येते कि, महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियत्रंण) अधिनियम, २००१ यात सुधारणा करणेसाठी सन. २०२१ चा अधिनियम क्र.४ दिनांक १० मार्च, २०२१ अन्वये लागु केलेला आहे.

अहिल्यानगर महानगरपालिकेने सदर अधिनियमाची अंमलबजावणी सुरु केलेली असुन त्यासाठी गुंठेवारी विकास धारकांना आवाहन करण्यात येते कि, त्यांनी या संधिचा आवश्य लाभ घ्यावा ज्या अनाधिकृत भुखंडाची मालमत्तेची दिनांक ०१/०१/२०२१ पुर्वी खरेदी असलेल्या गुंठेवारी विकास धारकांनी त्यांचे भुखंड बांधकामे नियमानुकुल करणेयाबतचे प्रस्ताव, जाहिर नोटीस वर्तमान पत्रात प्रसिध्द झाल्येच्या तारखेपासुन सहा महिने या मुद्दतीत, नगररचना विभाग, अहिल्यानगर महानगरपालिका येथे दाखल करावेत.

जे भुखंड धारक गुंठेवारी प्रस्ताव दाखल करणार नाहीत अश्या बांधकामांवर अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी

| (स्नेहल यादव) | (यशवंत डांगे) |
|---|---|
| सहाय्यक संचालक, नगररचना | आयुक्त |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

प्रसिध्दी विभाग जावक क्रमांक २०२, दि. ०१/०८/२०२५


# अण्णा भाऊ साठे

पृथ्वी ही शेष नागाच्या मस्तकावर तरली नसून ती कष्टकरी आणि श्रमिकांच्या तळहातावर तरली आहे. असा संदेश आपल्या जनतेला आणि समाजाला देणारे थोर विचारवंत, साहित्यरत्न, लोकशाहीर, दीन दलितांचे कैवारी, ज्यांनी आपल्या लेखणीतून समाजाची व्यथा मांडणाऱ्या असा अण्णाभाऊ साठे यांचा इतिहास हा मनाला भुरळ पाडणारा आहे. आज त्यांच्या जयंतीनिमित त्यांच्या विचारांना उजाळा देण्याचा आणि त्यांच्या कार्याला पुढे नेण्याचा त्यांच्या जन्मानिमिताने आपण प्रयत्न केलाच पाहिजे.

अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्यातील वाटेगाव येथे मातंग समाजात झाला होता. त्यांचे पूर्ण नाव तुकाराम भाऊराव साठे होते. पण लोक त्यांना अण्णा असे संबोधले होते. तेव्हापासून ते अण्णाभाऊ साठे हेच नाव प्रचलित झाले. अगदी लहानपणा पासूनच त्यांना गरिबीचे चटके भाजू लागले होते. गरिबीची झळ त्यांना लागत होती.

अण्णा भाऊ चे वडील भाऊराव यांना वाटत होते. त्यांच्या पोराने खूप शिकून मोठे व्हाव. पण तसे झाले नाही. असे म्हणतात की अण्णाभाऊ हे अगदी दिड दिवस शाळेत गेले होते. कारण शाळेत त्यांना वर्णभेद आणि जातीभेद या मुळे त्यांना वर्गामध्ये स्थान नव्हते. पण ती सल त्या बालवयातील अण्णा भाऊंना टोचत होती. त्यामुळे अण्णाभाऊ हे शाळेत गेले नाहीत.

घरच्या परिस्थितीमुळे त्यांना लवकरच मुंबईचा पल्ला गाठावा लागला. वाटेगाव ते मुंबई ते पायी अंतर चालत गेले. तिथे त्यांनी कामगाराचे जीवन अगदी जवळून पाहिले होते. मिळेल ते काम तिथे ते करत असत. काम करत असताना ते थोडी अक्षर ओळख झाली. आणि मग आपल्या विचारातून त्यांनी गरीब, अस्पृश, पीडित, शोषित, दलीत वर्गाच्या व्यथा ते आपल्या लेखणीतून मांडू लागले.

अण्णाभाऊ भाऊ यांनी ३७ कादंबऱ्या, ११ कथासंग्रह, ११ लोकनाट्य, ७ चित्रपटकथा, २ नाटक त्यांच्या काही कथांवर चित्रपट सुद्धा तयार झाले. त्यांची सर्वात गाजलेली कादंबरी म्हणजे फकिरा तसेच चित्रा, वारणेच्या खोऱ्यात, चिखलातील कमल, वैजयंता, या सारख्या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यांच्या लेखणीतला प्रत्येक नायक हा सत्य परिस्थिती दर्शवणारा होता. श्रीमंताच्या लुटीतून श्रमिक आणि गरिबांची पोटाची खळगी भरणारा फकिरा तर प्रचंड गाजला होता. माझी मैना गावाकड राहिली माझ्या जिवाची होतेय काहीली ही सुद्धा लावणी आतापर्यंत लोकांच्या आवडीची ठरली आहे.

१८ जुलै १९६९ रोजी अशा कलाकाराची प्राणज्योत मावळली. त्यांनी अखेरचा श्वास घेतला. अशा या थोर लेखकास आणि त्याच्या झुंजार लेखणीला माझा मानाचा मुजरा....

**– प्रा. कांबळे पूनम संजय**
(डिप्लोमा कॉलेज ऑफ इंजिनियरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, जामखेड)

